## ‘जल जीवन मिशन २.०’साठी सामंजस्य करार



**नागपूर** : राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीचे डिसेंबर २०२८पर्यंत हर घर जल प्रमाणीकरण साध्य करणे तसेच पाणीपुरवठा योजनांचे सक्षम संचलन आणि देखभाल सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारचे जलशक्ती मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्यात गुरुवारी (दि. १९) नवी दिल्ली येथे सामंजस्य करार पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपुरातून दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते, तर केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील, पेयजल आणि स्वच्छता विभागाचे सचिव अशोक मीना, केंद्रीय जल जीवन मिशनचे संचालक व अतिरिक्त सचिव कमल किशोर सोन, सह सचिव (जल) स्वाती मीना नाईक, संचालक प्रदीप सिंह तसेच नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त आर. विमला यांच्यासह प्रमुख वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २४१
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, २० मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


काशींद समुद्रकिनारी स्वयंचलित स्वच्छता मशिन/२
माणगाव येथील जामा मशिदीचे उद्घाटन अन् इफ्तार पार्टी/५
खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी तब्बल २१ वर्षांनी जेरबंद/७






# मराठी नववर्षाचे जल्लोषात स्वागत

## पनवेलमध्ये भव्य शोभायात्रा; वंदे मातरम् राष्ट्रीय गीताचा विशेष गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी नववर्षाचा पहिला दिवस अर्थात गुढीपाडवा गुरुवारी (दि. १९) रायगड जिल्ह्यात मोठ्या उत्साही वातावरणात साजरा झाला. जिल्ह्याच्या सर्वच भागात शोभायात्रा काढून नवीन वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. पनवेल शहरात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुढीपाडव्याच्या निमित्ताने निघालेल्या भव्य शोभायात्रेत संस्कृतीचे दर्शन घडले.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

गुढीपाडव्यानिमित्त घरोघरी मंगलमय वातावरण होते. सकाळी दारात गुढी उभारून तिचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शोभायात्रा निघाल्या. पनवेलमध्ये नववर्ष स्वागत समितीच्या वतीने आयोजित या शोभायात्रेने यंदा भव्यतेचा नवा उच्चांक गाठला. या दिमाखदार शोभायात्रेला शहरातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथून उत्साहात सुरुवात झाली. त्यानंतर ही मिरवणूक कर्मवीर भाऊराव पाटील चौक, टपाल नाका शनी मंदिर, महात्मा गांधी मार्ग, मिरची गल्ली, कापड बाजार, जय भारत नाका आणि लोकमान्य टिळक मार्ग या प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे भव्य समारोपास पोहचली.

दरम्यान, टिळक रोड, यशोमंगल नाका आणि सावरकर चौक परिसरात नववर्ष स्वागत समिती आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या वतीने करण्यात आलेली आकर्षक सजावट, रोषणाई आणि भगव्या पताकांनी सजलेले रस्ते पाहताना प्रत्येकाच्या डोळ्यांचे पारणे फिटत होते. ढोल-ताशांचा कडकडाट, लेझीमचा थरारक ताल, पारंपरिक वेशभूषेत सजलेले युवक-युवती आणि जय भवानी जय शिवाजीच्या घोषणांनी वातावरण अक्षरशः दणाणून गेले होते.

यंदाच्या शोभायात्रेचे सर्वात मोठे आकर्षण ठरली वंदे मातरम् या राष्ट्रगीताच्या १५० वर्षांच्या गौरवाची भव्य थीम. देशभक्तीने भारलेले चित्ररथ, जिवंत देखावे आणि प्रभावी सादरीकरणांनी उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. स्वातंत्र्य, संस्कृती आणि राष्ट्रीय अभिमान यांचा संगम येथील मिरवणुकीत ठळकपणे अनुभवायला मिळाला. परिसरातील तब्बल १४ संस्थांचे भव्य आणि आकर्षक चित्ररथ या शोभायात्रेत सहभागी झाले होते. प्रत्येक चित्ररथाने आपल्या कलात्मकतेने आणि संदेशाने प्रेक्षकांची मने जिंकली तसेच युवानाद ट्रस्ट तर्फे ध्वज-लेझीम-ढोल पथकात सुमारे १५० मुलांनी सहभाग घेत पारंपरिक सादरीकरणाने वातावरण भारून टाकले.



या दिमाखदार सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह महापौर नितीन पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, युवा नेते प्रितम म्हात्रे, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, राजू सोनी, सुमित झुंझारराव, नगरसेविका रूचिता लोंढे, प्रिती जॉर्ज, शिवानी घरत, अभिषेक पटवर्धन, केदार भगत, अमित ओझे, रूपेश नागवेकर, माधुरी गोसावी यांच्यासह पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, विविध पक्षांचे मान्यवर, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर सलग दुसऱ्या दिवशी अपघात

### कार ट्रेलरला धडकून तीन तरुणांचा मृत्यू

**पनवेल, खोपोली : वार्ताहर, प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अपघातांची मालिका सुरू असून गुरुवारी (दि. १९) सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या अपघातात तीन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.



एक्सप्रेस वेवर बुधवारी एका कंटेनरने समोरील पाच वाहनांना चिरडल्याने इनोव्हा कारमधील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असताना दुसऱ्या दिवशी गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी तीन कार मुंबईच्या दिशेने भरधाव वेगात एकापाठोपाठ ओव्हरटेक करत असताना भीषण अपघात झाला.

मृत विद्यार्थ्यांमध्ये नाशिक येथे मूळ राहणारा ओमकुमार बोरसे (२३), नागपूर येथील लय देशभ्रतार (२०) आणि जयपूर येथे मूळ राहणारा श्रेयांश शर्मा (२२) यांचा समावेश आहे. हे तिघे आपल्या अन्य मित्रांसह गुरुवारी पहाटे सुमारे ५ वाजता पवई येथील आयआयटी बॉम्बे कॅम्पसमधून खंडाळ्याकडे सूर्योदय पाहण्यासाठी रवाना झाले होते.

सूर्योदय पाहिल्यानंतर युवक मुंबईकडे परतत असताना पुढे जाण्याच्या घाईत एक्सप्रेस वेवरील पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत भाताण बोगद्यानजीक एका अज्ञात ट्रेलरच्या पाठीमागील खालच्या भागात त्यांची गाडी घुसली. अपघातग्रस्त युवकांना उपचाराकरिता कामोठे येथील महात्मा गांधी मिशन (एमजीएम) रुग्णालयात आणण्यात आले, मात्र रुग्णालयात पोहचेपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.







**पनवेल : येथील महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम आणि महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी निवडीनंतर गुरुवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, युवा नेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, अमर पाटील, अर्चना ठाकूर आदी उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला ठाकूर यांनी सभापतींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

## अशोक खरात प्रकरणाचा तपास एसआयटीकडे

**नाशिक : प्रतिनिधी**

वासनांध कृत्ये, अश्लील व्हिडीओंची धमकी आणि कोट्यवधींच्या खंडणीच्या आरोपांमुळे नाशिकमधील कॅप्टन अशोक खरात प्रकरणाची व्याप्ती आता वाढली आहे. राज्य शासनाने या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत तपास थेट विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) सोपविला आहे.

कॅ. अशोक खरात याच्याशी संबंधित नाशिक शहर आणि जिल्ह्यासह इतर भागात एकूण तीन स्वतंत्र गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. या गुन्ह्यांमुळे प्रकरणाचे स्वरूप केवळ लैंगिक अत्याचारापुरते मर्यादित न राहता ब्लॅकमेलिंग आणि आर्थिक गुन्ह्यांपर्यंत विस्तारल्याचे स्पष्ट



झाले आहे. विविध गंभीर गुन्ह्यांचा तपास एकत्रित आणि प्रभावीपणे करण्यासाठी शासनाने एसआयटी स्थापन केले आहे. त्याच्या प्रमुखपदी महिला आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एसआयटीमार्फत होणाऱ्या सखोल तपासामुळे आणखी पीडिता पुढे येण्याची आणि अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.

## महाडमध्ये आज भीमसागर उसळणार!

### चवदार तळे सत्याग्रहाचा ९९वा वर्धापन दिन

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाडमधील ऐतिहासिक चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचा ९९वा वर्धापन दिन शुक्रवारी (दि.२०) महाड येथे दिमाखात साजरा होत आहे. या वर्षापासून चवदार तळे सत्याग्रहाच्या



शतक महोत्सवी वर्षाला प्रारंभ होत असल्याने या सोहळ्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक नेते यावेळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी महाडमध्ये येणार आहेत. त्याचप्रमाणे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लाखो भीम अनुयायी महाडमध्ये गुरुवारपासूनच दाखल होऊ लागले आहेत. वर्धापन दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना चवदार तळे येथे शासनातर्फे पोलीस मानवंदना देण्यात येणार आहे.

सत्याग्रहाच्या वर्धापन दिन सोहळ्यासाठी चवदार तळ्याचा परिसर रोषणाईने उजळून गेला आहे. त्याचबरोबर क्रांतीस्तंभ येथेही मंडप उभारण्यात आला आहे. शासनातर्फे चवदार तळे सौंदर्यीकरणासाठी ५५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून या कामाचे भूमिपूजन शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणार आहे. या निमित्ताने क्रांतीस्तंभासमोरील मैदानात अभिवादन सभा होणार असून यासाठी भव्य मंडप उभारण्यात आला आहे.

मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्याचबरोबर लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भीम अनुयायांच्या पिण्याचे पाणी, जेवण, नाश्ता, राहण्याची व स्वच्छतागृहाची व्यवस्था प्रशासनामार्फत करण्यात आली आहे.




# शोभायात्रांनी रायगडात नववर्षाचे जोरदार स्वागत



**अलिबाग : प्रतिनिधी**

हिंदू नववर्षाचा पहिला दिवस अर्थात गुढीपाडवा आज (गुरूवारी) रायगड जिल्हयात मोठया उत्साही आणि भावपूर्ण वातावरणात साजरा झाला . जिल्हयाच्या सर्वच भागात शोभायात्रा काढून नवीन वर्षाचे स्वागत करण्यात आले .गुढीपाडव्या निमित्त घरोघरी मंगलमय वातावरण होते. सकाळी दारात गुढी उभारून तिचे पूजन करण्यात आले.

जिल्हयात सर्वत्र नववर्ष स्वागत यात्रा काढण्यात आल्या. अलिबाग शहरात नववर्ष स्वागत यात्रा समितीने दरवर्षी प्रमाणे ब्राम्हणआळी येथील श्रीराम मंदिरापासून स्वागत यात्रा काढली. ढोलताशांच्या गजरात हातात भगवे झेंडे आणि डोक्यावर भगवे फेटे बांधून महिला, पुरूष, युवक, युवती मोठया संख्येने यात सहभागी झाले होते. स्वागतयात्रेत वेगवेगळे चित्ररथदेखील सहभागी झाले होते. तरूणी पारंपारीक वेषात भगवे फेटे बांधून मोटार सायकलवर स्वार झाल्या होत्या. शहरात ठिकठिकाणी स्वागतयात्रेचे स्वागत करण्यात आले. संपूर्ण शहरभर फिरून श्रीकाशीविश्वेश्वर मंदिराजवळ यात्रेची सांगता झाली.

पूजेसाठी लागणारया झेंडूच्या फुलांना बाजारात मोठी मागणी होती . नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी नवीन वस्तूंची खरेदी मोठया प्रमाणावर झाली. सोने महागले असले तरी सोन्याचे दागिने खरेदी करण्यासाठी सराफी पेढयांवर गर्दी होती.

दुचाकी, चारचाकी वाहने यांचे बुकींग आधीच करून पाडव्याच्या दिवशी ही वाहने घरी आणण्यात आली. टीव्ही फ्रीज यासारख्या घरगुती वापराच्या वस्तूंच्या दुकानात देखील खरेदीसाठी गर्दी होती. अनेकांनी आपला नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी गुढीपाडव्याचा मुहूर्त साधला.

**पेण : प्रतिनिधी**

स्त्री अस्मिता आणि सन्मान यांचा जागर आज पेण शहरात एका भव्य आणि प्रेरणादायी रॅलीच्या माध्यमातून अनुभवायला मिळाला. अंकुर ट्रस्ट व महिला अत्याचार विरोधी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमाने सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक ठोस पाऊल टाकले.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणातून सुरू झालेली ही रॅली महात्मा गांधी वाचनालयापर्यंत विविध रंगांनी नटलेली होती. पारंपरिक वेशभूषा, लोकनृत्य आणि भुगा घालत महिलांनी आपली सांस्कृतिक ओळख जपत स्त्रीशक्तीचा जागर केला. या रॅलीचे नेतृत्व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले.

विशेष म्हणजे, या यात्रेत सर्व जाती, धर्म आणि विविध सामाजिक स्तरांतील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. एकल महिला, मतिमंद आणि अनाथ मुलींनाही सन्मानाने सहभागी करून घेण्यात आले, ज्यामुळे ही रॅली केवळ एक कार्यक्रम न राहता समावेशकतेचा आणि समानतेचा संदेश देणारी चळवळ ठरली.

आई डे केअर, चाईल्ड हेवन, अंकुर ट्रस्ट तसेच बाल संस्कार वर्ग समर कॅम्पमधील मुलेही सहभागी झाली होती. तसेच शासकीय आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील मुलींचाही सहभाग उल्लेखनीय असा ठरला.

या वेळेस बालसंस्कार समर कॅम्प, चाईल्ड हेवन आणि अंकुर ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी नवीन वर्षाचे स्वागत स्वच्छतेवर आधारित नाटिका सादर करून तसेच सामाजिक एकोप्याचा संदेश देणारे नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. रॅलीची सांगता महात्मा गांधी वाचनालयात करण्यात आली.

यावेळी आपल्या प्रास्ताविकात डॉ. वैशाली पाटील यांनी मराठी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत वंचित आणि दुर्लक्षित घटकांमध्ये एकजूट निर्माण होणे, तसेच सर्व धर्मांमध्ये एकोपा आणि समरसता प्रस्थापित होणे ही परिवर्तनवादी चळवळीची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

या प्रसंगी आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांनी समस्त भगिनींना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. आभार प्रदर्शन शैला धामणकर यांनी केले. या उपक्रमाने पेणकरांचे लक्ष वेधून घेतले





**उरण : बातमीदार**

गुढीपाडवा हा मराठी नववर्षाचा पहिला दिवस (चैत्र शुद्ध प्रतिपदा) असून वसंत ऋतूचे स्वागत करणारा आणि समृद्धीचे प्रतीक असलेला सण आहे. या दिवशी घरोघरी नवीन वस्त्र, कडुनिंब व फुलांनी सजलेले गुढी उभारून पुरणपोळीचा बेत करून आनंदोत्सव साजरा केला जातो. हा हिंदू धर्मातील साडेतीन मुहूर्तापैकी एक महत्त्वाचा मुहूर्त आहे.

गुढीपाडवा हा एक भारतीय सण असून तो हिंदू दिनदर्शिका प्रमाणे चैत्रशुद्ध प्रतिपदेला महाराष्ट्रात साजरा करतात शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. असा हा पवित्र सण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने दरवर्षी देशभरात सर्वत्र साजरा केला जातो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काही मोजकेच सण साजरे करतो त्यापैकी गुढीपाडवा हा एक सण आहे.

उरण शहरातील देऊळवाडीतील श्री संगमेश्वर महादेव देवस्थान येथील श्री शंकराच्या मंदिरासमोरील मैदानात हा कार्यक्रम मोठा उत्साहात संपन्न झाला. यावेळी ध्वजवंदना , संघ प्रार्थना गीत,त्यानंतर सुभाषित,वचन सांगण्यात आले. श्रीपाद कातरणे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देशभरात कोणकोणते कार्य सेवाभावी वृत्तीने करत आहे याची माहिती दिली त्यानंतर सर्वांनी एकमेकांचा परिचय करून घेतला व त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना राष्ट्रीय त्याचे समाज येथे काम समाजात देशात करत असून राष्ट्राच्या प्रत्येक कार्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे.





**कर्जत : प्रतिनिधी**

मराठी नववर्षाच्या स्वागताचा सण म्हणजे गुढीपाडव्या निमित्त कर्जत मधील अनेक संस्था एकत्र येऊन कर्जत शहरात मराठी नववर्ष स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील बहुतांश गावात गुढ्या उभारून गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला. अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेच्या वतीने कडुलिंबाच्या रोपांचे वाटप करून 'गुढी पाडवा कढीनिंब वाढवा' हा संदेश देण्यात आला.

कपालेश्वर देवस्थान समिती, सार्वजनिक गणेशोत्सव समिती, विश्वहिंदू परिषद, बजरंग दल, प्रजापती ब्राह्मकुमारी ईश्वरी विश्व विद्यालय, शिवतांडव प्रतिष्ठान ढोल ताशा पथक आदींनी एकत्र येऊन स्वागत यात्रेचे आयोजन केले होते. टिळक चौकातून या स्वागतयात्रेचा शुभारंभ करण्यात आला.या शोभायात्रेत उपगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक राजाभाऊ कोठारी, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, वैभव सुरावकर, रोहित ओसवाल माजी नगरसेवक सुनील गोगटे, सुरेखा शितोळे, साईनाथ श्रीखंडे, दिनेश कडू, अभिजीत मराठे, दिलीप गडकरी, पद्माकर गांगल, महेंद्र बोडके, मधुकर घरत, मैत्र जिवजी, दिनेश रणदिवे, सुनील सोहनी, अमोल देशमुख, स्नेहा गोगटे, ज्योती कडू, ऍड. अभिषेक तिवारी, सर्वेश गोगटे, परेश शहा, मिलिंद खंडागळे, स्वराली गोगटे आदी कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्वागत यात्रेत ढोल पथकांनी उपस्थितांचे मन जिंकले. विशेषतः युवतींनी ढोल वाजवून आपली चमक दाखवून दिली. गावा गावात घरो घरी गुढ्या उभारून नव वर्षाचे स्वागत करण्यात आले. गुढी पाडव्याचे औचित्य साधून अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला राष्ट्रीय हरित सेना आणि सामाजिक वनीकरण विभाग रायगड अलिबाग परिक्षेत्र कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गुढी पाडवा कडूनिंब वाढवा' या पर्यावरण पोषक उपक्रमाच्या माध्यमातून कडूनिंबाच्या रोपांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी हरित सेनेचे विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

**नवी मुंबई : बातमीदार , प्रतिनिधी**

तुर्भे स्टोअर येथे चैत्र नवरात्र आणि गुढी पाडवा या शुभ पर्वानिमित्त नव दुर्गा माता चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने भव्य कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात सुभाष सरोज, विद्याधर तिवारी, सुनील गुप्ता (प्रेस), ए. के. सिंह, रमेश वैजू प्रसाद, पन्नालाल गुप्ता, सुंदर निषाद, संजय प्रजापती, बबली माळी, सुरेंद्र पलटन प्रसाद, पप्पू मोरया, उमेश मौर्य, मनीष गुप्ता, विजय सिंह (रेती वाले), माजी नगरसेवक राजेश शिंदे, उत्तर भारतीय संघटनेचे संस्थापक रामस्वरूप दाहिया तसेच ट्रस्टचे सल्लागार व उत्तर भारतीय नेते कमलेश वर्मा यांसह शेकडो कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

हा पवित्र उत्सव मागील ३० वर्षांपासून उत्तर प्रदेशातील परंपरेनुसार साजरा केला जात असून, त्यामध्ये कन्या पूजन, कन्या भोजन तसेच देवीमातेच्या उपासक माता-भगिनींना साडी वाटप यांसारखे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवले जातात.या कलश यात्रेत सुमारे ३०० माता-भगिनींनी उपवास ठेवून अनवाणी पायाने तुर्भे परिसरातील विविध मंदिरे व देवीमातेच्या मंडपांचे दर्शन घेतले.





**अलिबाग : गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक पद्धतीने गुढी उभारून पूजन करताना कुटुंबीय.** (छाया : जितू शिगवण)

## काशीद समुद्रकिनारी स्वयंचलित स्वच्छता मशिन उपलब्ध

**मुरुड : प्रतिनिधी**

समुद्रकिनार्यांवर होत असलेल्या कचर्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला जात आहे. प्लास्टिक बाटल्या, मलमूत्रासह कचर्यामुळे किनार्यावरील प्रदूषण वाढण्याची भीती अधिक असते. किनार्यावरील हे प्रदूषण थांबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पुढाकाराने किनार्यावरील स्वच्छता राखण्यासाठी स्वयंचलित समुद्र किनारा स्वच्छता यंत्र काशीद ग्रामपंचायत मधील समुद्र किनारा स्वच्छ करण्यासाठी देण्यात आले आहे.

सदर मशीन काशीद ग्रामपंचायत यांना मिळावी यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी



अधिकारी डॉक्टर नेहा भोसले यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.सुमारे दोन किलोमीटर पेक्षा जास्त समुद्र किनारा काशीद ग्रामपंचायत मध्ये आहे.सर्वाधिक पर्यटक काशीद समुद्र किनारा पहाण्यासाठी दर वर्षी सात लाखापेक्षा जास्त पर्यटक येथे येत असतात.लाखोच्या संखेने पर्यटक येथे आल्याने प्लास्टिक बॉटल,जेवणाच्या पत्रावळ्या,घोड्यांची विष्ठा मोठ्या प्रमाणात समुद्र किनारी साचत असते. ही निकड लक्षात घेऊन समुद्र किनारा स्वच्छ राहण्यासाठी सुमारे ७५ लाख रुपये खर्च करून महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने स्वयंचलित समुद्र किनारा स्वच्छता यंत्र देण्यात आले आहे.

आज काशीद समुद्र किनारी या यंत्राचे मुरुड पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ यांच्या शुभ हस्ते विधिवत पूजा करून श्रीफळ वाढवून लोकार्पण करण्यात आले.या कार्यक्रम प्रसंगी मुरुड पंचायत समिती चे गट विकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ,माजी सभापती बाबू नागावकर,काशीद ग्रामपंचायत सरपंच संतोष राणे,शिवसेनेचे जिल्हा उप प्रमुख भरत बेलोसे,काशीद ग्रामपंचायत सदस्य सुविधा दिवेकर,समीक्षा दिवेकर,दीपेश कासार,निलेश दिवेकर,ईश्वर चाचे ,ग्रामपंचायत अधिकारी सुशांत ठाकूर, भोईघर ग्रामपंचायत अधिकारी संतोष नागोटकर,नांदगाव सरपंच अल्पा घुमकर,यशवंत पाटील,ग्रामपंचायत कर्मचारी प्रशांत खेडेकर,पूजा महाडिक,आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## 'आरसीएफ'च्या निधीतून मापगावमध्ये व्यायामशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मापगाव येथे आर.सी.एफ. थळ यांच्या कॉर्पोरेट सामाजिक दायित्व निधीतून (सी एस आर) सुसज्ज व अत्याधुनिक व्यायामशाळा उभारण्यात आली आहे . गुरुवारी ( दि. १९ ) आरसीएफ थळचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांच्या हस्ते या व्यायाम शाळेचे उद्घाटन करण्यात आले.

या व्यायामशाळेसाठी आवश्यक सर्व अत्याधुनिक उपकरणे आर.सी.एफ. कंपनीतर्फे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या उपक्रमामुळे मापगाव व परिसरातील युवक-युवतींना आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे.

उद्घाटन प्रसंगी बोलताना कार्यकारी संचालक नितीन हिरडे म्हणाले की, आजच्या तरुण पिढीने लहान वयापासूनच आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. या उद्देशाने ही व्यायामशाळा उपलब्ध करून देण्यात आली असून, यामुळे युवकांमध्ये नियमित व्यायामाची सवय लागेल आणि भविष्यात ते निरोगी राहण्यास मदत होईल.



## खोपोलीत घरफोडी करून पावणेदोन लाखांचा ऐवज चोरला

**खोपोली :** घरातील दैनंदिन सामान खरेदी करण्यासाठी खोपोली बाजारपेठेत गेलेल्या महिलेच्या घराचे कुलुप तोडून चोरट्यांनी बेडरूम मधील कपाटातील एकूण १लाखस७० हजार रुपये व किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे.

खोपोली पोलीस ठाणे हद्दीत मुळगाव खोपोली येथे राहणारी महिला आणि तिचा मुलगा मंगळवारी (१७मार्च रोजी) सकाळी साडेदहा वाजण्याच्या दरम्यान सामान खरेदी करण्यासाठी खोपोली बाजारपेठ मध्ये गेले होते. दैनंदिन सामान खरेदी करुन घरी परत आल्यानंतर घराचे दरवाजाचे कुलुप तोडल्याचे लक्षात आले. घरात जावून पाहिले असता लोखंडी कपाटाचे व लॉकरचे लॉक तोडुन सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरीला गेल्याचे आढळून आले. याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक एस जगताप हे करीत आहेत.

## नारीशक्ती पुरस्काराने दिपाली पारसकर यांचा सन्मान



**पनवेल : वार्ताहर**

जागतिक महिला दिनानिमित्त मानवी हक्क संरक्षण फेडरेशन व केंद्रीय लोकशाही पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात नारी शक्ती पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. या प्रसंगी पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दिपाली पारसकर यांना नारीशक्ती पुरस्कार पत्रकारिता क्षेत्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याला पनवेलचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, रविशेठ पाटील, निलेश भोईर, अमर ठाकूर, सुधीर पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रांत ठसा उमटवणाऱ्या १६ महिलांना मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

## कर भरा आणि शहर विकासाला हातभार लावा : मुख्याधिकारी

**माणगाव : बातमीदार**

माणगांव नगरपंचायतीकडून नागरिकांनी प्रलंबित कर वेळेत भरून शहराच्या विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्याधिकारी संतोष माळी यांनी केले आहे. नगरपंचायतीच्या विविध विकासकामांसाठी कर महसूल हा प्रमुख स्रोत असून, नागरिकांनी जबाबदारीची जाणीव ठेवून कर भरणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

मुख्याधिकारी माळी म्हणाले की, शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची गरज असते. नागरिकांकडून वेळेत कर वसुली झाल्यास ही कामे अधिक गतीने आणि प्रभावीपणे राबविता येतात. त्यामुळे थकबाकीदार नागरिकांनी विलंब न करता आपले कर भरावेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

माणगांव नगरपंचायतीवर सुमारे ६० लाख रुपयांची कर थकबाकी असल्याचे समोर आले असून, अशा परिस्थितीत नगरपंचायतीचे दैनंदिन कामकाज आणि विकासकामे कशी चालवायची, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, आपले शहर - आपली जबाबदारी या भावनेतून सर्वांनी कर भरण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

# सशक्त महिला, सक्षम समाजासाठी कटिबद्ध -ममता म्हात्रे

**पनवेल : वार्ताहर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाच्या महिला सक्षमीकरण, आरोग्य व रोजगारविषयक धोरणांना अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा मी दृढ संकल्प करते. मिळालेल्या या जबाबदारीचे संधीमध्ये रूपांतर करून शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून सकारात्मक आणि परिणामकारक काम करण्याचा माझा निर्धार असल्याचे महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी सांगितले.



पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका ममता म्हात्रे यांची महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याची दखल घेत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाकडून ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. ममता म्हात्रे या २०१० पासून सामाजिक कार्यात सक्रिय असून २०२५ मध्ये त्यांनी राजकारणात पदार्पण केले. फॅशन डिझायनिंगचे शिक्षण घेतलेल्या ममता म्हात्रे या प्रभाग क्रमांक १८ मध्ये एक संवेदनशील, तत्पर आणि उत्तरदायी लोकप्रतिनिधी म्हणून ओळखल्या जातात. राजकारणापेक्षा समाजकारण या विचारसरणीवर विश्वास ठेवत त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची कार्यपद्धती जपली आहे.

भारतीय जनता पक्षाच्या सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या मूलमंत्रानुसार त्यांनी आपल्या कार्यात सर्वसमावेशक विकास, पारदर्शकता, सेवा भाव व जनहित या नीतिमूल्यांना प्राधान्य दिले आहे. महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात त्यांनी गेली १५ वर्षे सातत्याने काम करत १००% महिलांच्या व्यापारी-ग्राहक पेठांचे आयोजन, महिला बचतगटांना आर्थिक व प्रशिक्षण सहाय्य, तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

भारतीय जनता पक्षाचा सशक्त महिला - सक्षम समाज हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून साकारला आहे. आरोग्य सेवेत त्यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, महिलांसाठी थायरॉईड व एचबी-१सी तपासण्या, चष्मा वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, औषध वितरण यांसारख्या उपक्रमांद्वारे हजारो नागरिकांना दिलासा दिला आहे. प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपचार या संकल्पनेला त्यांनी प्राधान्य दिले आहे. रोजगार निर्मिती व युवक सक्षमीकरणासाठी त्यांनी रायगड व नवी मुंबई परिसरात १०,००० हून अधिक कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देण्यात योगदान दिले आहे.

ममता म्हात्रे यांच्या निवडीमुळे महिला व बालकल्याण विभागाच्या कामकाजाला अधिक गती मिळून समाजातील दुर्बल घटकांना अधिक सक्षम आधार मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांनी भविष्यातही समाजहिताच्या विविध उपक्रमांद्वारे पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान देत राहावे, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## अल्पवयीन मुलावर अत्याचार; मौलानाला बेड्या

**पनवेल : वार्ताहर**

खारघर शहरात माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका ११ वर्षीय निष्पाप मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्याप्रकरणी खारघर पोलिसांनी एका मौलानाला अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून आरोपी मौलानावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

हा मौलाना व पीडित मुलगा हे दोघेही एकाच परिसरात राहतात. पीडित मुलगा आपल्या परिसरात खेळत असताना या मौलानाने पीडित मुलाला दुचाकीवरून फिरवून आणण्याच्या बहाण्याने घेऊन गेला व त्याला खारघर मधील फुटबॉल ग्राऊंडच्या मागील मोकळ्या मैदानात नेऊन त्याच्यावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केले.

## लोकलच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पनवेल :** खारघर रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक १ वर उभ्या असलेल्या एका महिलेला लोकलची धडक लागल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना घडली. प्रत्यक्षदर्शीच्या माहितीनुसार महिलेने आत्महत्या केली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे.

लविंदर कौर सरवन सिंग गिल (५०) असे या महिलेचे नाव असून, त्या खारघर रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक १ च्या सीएसएमटी टोकावर उभ्या होत्या. या वेळी पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या लोकलची त्यांना जोरात धडक लागल्याने त्या गाडीखाली सापडून गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला



**पनवेल : तालुक्यातील दापोली ग्रामस्थ मंडळाच्या वतीने श्रीविष्णू-लक्ष्मी गुढीपाडवा पालखी महोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या पालखी सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, सुभाष म्हात्रे, गजाननशेठ पाटील, के.ए. म्हात्रे यांच्यासह इतर उपस्थित होते. मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.**



**उरण : उरणच्या शैक्षणिक क्षेत्रात आज एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला असून Aura Preschool & Academy या नव्या शैक्षणिक संस्थेचे भव्य उद्‌घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते पार पडले. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर या शाळेचा शुभारंभ करण्यात आला. उद्‌घाटन सोहळ्यास उपनगराध्यक्ष रवी भोईर, नगरसेविका सायली म्हात्रे, नगरसेवक ॲड. पराग म्हात्रे, भाजप शहराध्यक्ष कौशिक शहा, विशाल पाटेकर तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** रस्ता क्रॉस करणाऱ्या ४१ वर्षीय वेटरला अज्ञात वाहनाने धडक दिली. या धडकेत त्याचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

धनेश्वर चंद्रशेखर दास हा कोन गाव येथे राहत असून तो मिठास स्वीट मार्ट समोरील रस्त्यावर जुना मुंबई पुणे महामार्ग कोनगाव येथे पायी रस्ता क्रॉस करत असताना अज्ञात वाहनाने भरधाव वेगाने त्याला धडक दिली. या धडकेत त्याच्या डोक्याला, खांद्याला गंभीर दुखापत झाली आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर वाहन चालक घटनास्थळावरून पळून गेला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलिस अधिक तपास करत आहेत.



**पनवेल : गुढीपाडवा व नवीन वर्षानिमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी कामगार नेते सुरेश पाटील, भाजपचे उरण तालुका उपाध्यक्ष विशाल म्हात्रे, अमृत ठाकूर, मधुकर पाटील, सुरेश ठाकूर उपस्थित होते.**

## वहाळ येथील साई मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील वहाळ येथील श्री साई देवस्थानच्या वतीने साई मंदिराचा १४ वा वर्धापन दिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात गुरुवारी साजरा करण्यात आला.



गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर १४ वर्षांपूर्वी या मंदिराची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. त्या पवित्र दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे यंदाही भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला.

या वर्धापन दिनानिमित्त मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. साईबाबांच्या पूजन, आरती आणि भजन-कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. सबका मालिक एक या साई संदेशाचा अनुभव प्रत्येक भाविकाला यावेळी आला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपाचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, साई संस्थान वहाळचे संस्थापक रवीशेठ पाटील, जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, उलवा नोडचे भाजप अध्यक्ष निलेश खारकर, बाळाराम पाटील, माधुरी गोसावी, युवा नेते धीरज ओवळेकर, शैलेश भगत यांच्यासह साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत साई संस्था वहाळ यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच समाजात सद्भावना, सेवा आणि एकतेचा संदेश देण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमासाठी साई संस्थान वहाळच्या वतीने उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. हजारो साईभक्तांनी उपस्थित राहून दर्शन घेतले आणि प्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण परिसर साईरामच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.



**पनवेल : वहाळ येथील साई मंदिरात वर्धापनदिनी भाजपचे राज्य परिषदेचे सदस्य अरुणशेठ भगत, पं.स. उपसभापती भूपेंद्र पाटील यांनी दर्शन घेतले. यावेळी रविशेठ पाटील, बाळूशेठ उपस्थित होते.**

## जेसीबीच्या धडकेत एकजण ठार

**पनवेल :** जेसीबी चालकाच्या निष्काळजीपणामुळे एका निरीक्षकाला प्राण गमवावे लागल्याची दुर्दैवी घटना पनवेलमधील सुकापूर येथे घडली आहे. अमोल राठोड (३६) असे या दुर्घटनेत मरण पावलेल्या सुपरवायझरचे नाव आहे. खांदेश्वर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेल्या जेसीबीचालकावर गुन्हा दाखल केला आहे. अमोल राठोड हा उलवे येथे राहण्यास होता तसेच तो ओंकार कन्स्ट्रक्शन कंपनीत सुपरवायझर म्हणून काम करत होता. नवीन पनवेलमधील सुकापूर येथील बालाजी सिम्फनीजवळ नाल्याचे काम सुरू असताना अमोल हा निरीक्षक म्हणून तेथे देखरेख करत होता.



**पनवेल : टेंभोडे गावात महापालिकेच्या महिला व बालकल्याण समिती सदस्य नगरसेविका ॲड. प्रतिभा सुभाष भोईर आणि ह्यूमन राईट्स फेडरेशनच्या सुषमा भागित उपाध्यक्ष यांनी, ज्या महिलांनी उद्योग आधार काढले होते त्यांचे रॅम प्रोजेक्टमध्ये रजिस्ट्रेशन केले आणि त्यांना शासनाकडून डिजिटल मार्केटिंग आणि डिजिटल लोन याबद्दल माहिती दिली तसेच व्यवसाय कसा करावा, कोणकोणती कागदपत्रे असावीत, लोन कुठून घ्यावे या संपूर्ण विषयी मार्गदर्शन केले. यावेळी महिलांनी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभाग घेतला.**

## ज्ञानपेटी : देण्याची संस्कृती जपणारी प्रेरणादायी चळवळ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे आणि घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हातच घ्यावे - या विंदा करंदीकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन आदर्श शैक्षणिक समूह संचलित श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशनतर्फे राबवली जाणारी ज्ञानपेटी ही संकल्पना गेल्या आठ वर्षांपासून समाजातील गरजू विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे.



महाविद्यालयातील विद्यार्थी स्वतःच्या स्वखर्चातून वर्षभर शैक्षणिक साहित्य जमा करून ही ज्ञानपेटी भरतात आणि वर्षअखेर ते साहित्य वाड्या-वस्त्या, झोपडपट्ट्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना वितरित केले जाते. यावर्षी सुषमा पाटील माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, कामोठे येथे सुमारे २०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य बबन काटकर, संदीप नेतकर, प्रकाश म्हात्रे, सागर कोळी, विनोद नाईक उपस्थित होते. तसेच श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे , उपप्राचार्य डॉ. विनायक लोहार, डॉ. नेहा म्हात्रे , डॉ. प्रितेश वाडे, प्रा. निलेश अडसुळे, प्रा. राजू गायकवाड , प्रा. सुषमा संकपाळ यांच्यासह योगेश ठोकळ, शिवांजली पांढरपट्टे, महेश जाधव, संजय सुरवाडे व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**पनवेल : गुढीपाडवा शोभायात्रेनिमित्त ओम चैतन्य कानिफनाथ मित्र मंडळातर्फे मंगेश पिलविळकर यांनी वडापावचे वाटप केले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, भाजप जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, नगरसेवक राजू सोनी, सुमित झुंझारराव, विलास गायकवाड, मंदार देसाई, चैतन्य सोनवणे, राम पाटील, अमोल पन्हाळे, गणेश पिलविळकर, मंथन पिलविळकर आदी उपस्थित होते.**

## वळवलीत विद्यार्थ्यांसाठी रसायनशास्त्रावर जागृती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वळवली गावात विद्यार्थ्यांसाठी रसायनशास्त्र विषयाचे महत्त्व आणि दैनंदिन जीवनातील उपयोग या विषयावर विशेष जागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. चांगु काना ठाकूर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शिक्षणविस्ताराच्या विचारातून प्रेरित होऊन हा कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना रसायनशास्त्राचे दैनंदिन जीवनातील उपयोग, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विषयाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. शैलेश वाजेकर, ॲक्टिव्हिटी कोऑर्डिनेटर डॉ. व्ही. एस. कांबळे, राहुल पाटील, चंद्रकांत परकाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती घोसाळकर, रेश्मा पाटील, दयानंद मोकल आदी उपस्थित होते.

## पोयंजेवाडीचा रस्ता झाल्याने आदिवासी बांधव समाधानी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोयंजे वाडीचा अर्धवट असलेला रस्ता ३५० मीटरचा रस्ता पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत काँक्रेटचा करण्याचे दिलेले आश्वासन अनंत पाटील यांनी पुर्ण केल्याने आदिवासी बांधवांनी समाधान व्यक्त करुन त्यांचे आभार मान्ले



पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत पोयंजे वाडी मध्ये आदिवासी बांधवाची एकच मागणी होती कि निवडणूक झाली कि आमच्या वाडी कडे कोण लक्ष देत नाही आम्हाला आमच्या राहिलेला रस्ता काँक्रेटचा झाला पाहिजे. त्यांनी ही मागणी भाजपच्या पंचायत समितीच्या उमेदवार अस्मिता पाटील व जिल्हा परिषदेच्या उमेदवार अनन्या गाताडे यांच्या कडे केली . त्यावेळी कोणताही विचार न करता अनंत पाटील दादा नी शब्द दिला कि जशी निवडणूक होईल त्या नंतर कोणताही निधी मिळो किंवा न मिळो मी रस्ता चांगल्या प्रकारे व काँक्रेटचा बनून देईन

त्याप्रमाणे कोणताही एक रुपयेचा निधी न वापरता स्व खर्चाने ३५० मिटरचा रस्ता आज पूर्ण केला. खरं तर निवडणूक आली कि आदिवासी समाजाला उमेदवार भूलथाप्पा मारत असतात पण शब्द पाळणारे अनंता शेठ पाटील यांच्या सारखे खूप कमी लोक मिळतात अशी भावना यावेळी आदिवासी बांधवांनी व्यक्त केली

## संपादकीय

# आव्हानांमध्ये वाढ

ईडीच्या छाप्यादरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केलेल्या हस्तक्षेपाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नाराजी व्यक्त केली. 'आयपॅक'च्या कार्यालयात पोहोचून तुम्ही योग्य केले नाही अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने ममता यांना सुनावले आहे. आक्रस्ताळेपणा हीच कार्यशैली असलेल्या ममता बॅनर्जी यातून काही बोध घेतील अशी अपेक्षा मात्र कुणीही करू शकणार नाही.

**गेली पंधरा वर्षे ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसची पश्चिम बंगालमध्ये सत्ता आहे. या सत्ताकाळात तेथे काय सुरू आहे हे अवघा देश पाहतो आहे. ममता यांच्या सरकारवर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप, मतपेढी जोपासण्यासाठी त्यांनी वर्षानुवर्षे चालवलेले अल्पसंख्याकांचे लांगुलचालन, सदोदित कायदे धाब्यावर बसवून मनमानी करण्याची दुराग्रही वृत्ती आणि आपल्या पक्षाचे नेते-कार्यकर्ते कसेही वागले तरी त्यांना बेदरकारपणे पाठिशी घालण्याची सवय हे सगळ्यांच्याच परिचयाचे झाले आहे. जानेवारीत सक्तवसुली संचालनालय म्हणजेच 'ईडी'च्या अधिकाऱ्यांनी 'आयपॅक' या संस्थेच्या पश्चिम बंगालमधील कार्यालयावर छापा घातला, तेव्हा त्यांच्या आधी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीच कार्यालयात घुसून लॅपटॉप, फोन व दस्तावेज ताब्यात घेतले. आयपॅक ही संस्था ममता बॅनर्जी यांच्यासाठी राजकीय रणनीती तयार करते. संबंधित प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले व त्यावर सध्या सुनावणी सुरू आहे. त्यावेळच्या ममता बॅनर्जी यांच्या वर्तणुकीवरून सर्वोच्च न्यायालयाने आता त्यांना फटकारले आहे. जर उद्या इतर एखाद्या राज्यातील मुख्यमंत्री अशातऱ्हेने छाप्यात घुसले तर ईडीकडे कोणताही उपाय नसेल का, असा सवालही न्यायालयाने केला व असा संघर्ष टाळण्यासाठी उपाय शोधला पाहिजे असेही म्हटले आहे. अर्थात न्यायालयाच्या फटकारण्याने ममता यांच्या कार्यशैलीत बदल घडेल अशी मात्र कुणाचीच अपेक्षा नसावी. आक्रस्ताळेपणा हा ममता दीदींच्या कार्यशैलीचा ठळक भाग राहिलेला आहे. केंद्रीय यंत्रणा बिगरभाजपशासित राज्यांना आकसाची वागणूक देतात असा कांगावा दीदी सतत करत आल्या आहेत. मतदारयाद्यांच्या फेरपडताळणीच्या नावाखाली तब्बल ६३ लाख मतदारांची नावे वगळली गेल्याची ओरडही ममता बॅनर्जी यांनी चालवली आहे. जिथे आपल्या पक्षाला मोठे समर्थन मिळते अशा अल्पसंख्याकबहुल मतदारसंघांमध्येच प्रामुख्याने ही नावे वगळण्यात आल्याचा त्यांचा दावा आहे. वास्तविक यावेळची विधानसभा निवडणूक आपल्यासाठी सोपी नाही हे ममता बॅनर्जी नीट जाणून आहेत. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत यावेळी भाजपने तृणमूल काँग्रेससमोर तगडे आव्हान उभे केले आहे. पंधरा वर्षांपूर्वी दीदींची राजवट सुरू झाली तेव्हा अवघ्या तीन जागा असलेल्या भाजपचे आज पश्चिम बंगालमध्ये ७७ आमदार आहेत. पश्चिम बंगालमधील जनता ममता बॅनर्जी यांच्या आक्रस्ताळ्या, एककल्ली कारभाराला कंटाळली आहे आणि राज्यातील लांगुलचालनाचे, गुंडागर्दीचे राजकारण संपावे असेही तेथील सुजाणांना वाटते. पण वाट्टेल ते करून सत्ता टिकवण्याचा प्रयत्न केल्याशिवाय तृणमूल काँग्रेस थांबणार नाहीच. यातून तेथे नेहमीप्रमाणे निवडणूक हिंसा होऊ नये अशीच प्रार्थना सर्वसामान्य बंगाली सध्या करत असतील. याआधीच्या विधानसभा निवडणुकीत महिलांसाठीची 'लक्ष्मीर भांडार योजना' व बेरोजगार तरुणांना केलेले अर्थसाह्य यांची मोठी मदत तृणमूल काँग्रेसला झाली होती. परंतु तेथील मतदारांनाही आता अशा मदतीपेक्षा खरोखरीचा विकास साकारू शकणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे सरकार हवे आहे. बंगाली प्रादेशिक अस्मितेच्या पोकळ राजकारणापेक्षा विकासाचा मुद्दाच महत्त्वाचा आहे हे सर्वसामान्य नागरिकांनाही कळून चुकले आहे.**

# राजिपमध्ये नवे पर्व; बॅकलॉग भरून काढण्याची संधी

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक झाली. अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवडणूक झाली. २३ मार्च रोजी सभापतींची निवड होईल. त्यानंतर खऱ्या अर्थाने जिल्हा परिषदेचे कामकाज सुरू होईल. जिल्हा परिषदेसमोर महसूल वाढणे, पिण्याच्या पाण्याची टंचाई, सांडपाणी निचरा, घनकचरा व्यवस्थापन, घरपट्टी व पाणीपट्टी वसुली या प्रमुख समस्या आहेत. गेली अनेक वर्षे जिल्हा परिषदेवर प्रशासक होता. आता निवडणुकीनंतर नवीन लोकप्रतिनिधी सत्तेत आल्याने त्यांना काम करण्यास चांगला वाव मिळणार आहे.

रायगड जिल्ह्याचा बराचसा भाग ग्रामीण आहे, परंतु राज्य शासनाच्या धारणानुसार प्रत्येक तालुक्याच्या गावात नगरपंचायती निर्माण करण्यात आल्या. त्यामुळे या मोठ्या ग्रामपंचायातींकडून मिळणारा महसूल कमी झाला आहे. तो वाढविण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी आणि घरपट्टी थकबाकी असते. ती वसूल होत नाही. त्यासाठी काही कडक धोरणे राबवाबी लागतील. जिल्ह्यात नागरीकरण वेगाने होत आहे. विशेषतः उत्तर रायगडमध्ये शहरीकरणाचे प्रमाण जास्त आहे. पनवेल महापालिका आहे. त्या आसपास असणाऱ्या ग्रामपंचयातींमध्येदेखील मोठमोठी गृहसंकुले उभी राहत आहेत. अलिबाग, कर्जत, खालापूर, पेण या तालुक्यामंध्येही इमारतींचे बांधकाम होत आहे. मोठ-मोठाले गृहनिर्माण प्रकल्प उभारले आत आहेत. त्यामुळे लाकसंख्या वाढत आहे. परिणमी अनेक समस्या निर्माण होत आहेत. ज्या प्रमाणात जिल्ह्यात लोकसंख्या वाढत आहे तिचा विचार केल्यात भविष्यात ग्रामीण भागात अनेक समस्या निर्माण होणार आहेत.

अलिबाग व आसपासच्या परिसरात बांधकामे होत आहेत. मोठे गृहप्रकल्प उभारले जाणार आहेत. बांधकामांना परवानगी दिली जाईल, परंतु त्यांना पाणी कुठून देणार याचा विचार करणे आवश्यक आहे. अलिबाग तालुक्यात अलिबाग नगर परिषद आणि ४० ग्रामपंचायतींना सध्या एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. आरसीएफ कंपनीच्या पाईपलाईनला जोडणी देऊन हा पाणीपुरवठा केला जातो, परंतु हे पाणी कमी पडत आहे. जिल्ह्यात निवासी क्षेत्र वाढणार आहे, पण त्यासाठी मुबलक आणि किफायतशीर दरात पाणी उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने शासनस्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे.

नागरिकीकरणामुळे घनकचरा व्यवस्थापनाची समस्या जाणवू लागली आहे. ही जिल्ह्याची सर्वात मोठी समस्या आहे. जर त्यावर आताच काही उपयायोजना केली गेली नाही, तर भविष्यात ही समस्या गंभरी स्वरूप घेईल. शासनस्तरावर याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. अलिबाग, पेण, उरण, पनवेल, कर्जत, खालापूर या तालुक्यांमुध्ये मोठ्या प्रमाणावर शहरीकरण होत आहे. पनवेल महानगरपालिका बनली आहे. या महापालिकेच्या आसपासच्या गावांमध्येदेखील आत मोठ-मोठाले टॉवर्स उभे राहिले आहेत. या नागरीकरणामुळे कचरा निर्माण होत आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. पुरेशा जागेअभावी ग्रामीण भागात कचरा व्यवस्थापन करणे ग्रामपंचायतीसाठी डोईजड होऊ लागले आहे.

जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती आहेत. यापैकी बहुतांश ग्रामपंचायतींकडेही कचरा उचलण्यासाठी घंटागाड्याच उपलब्ध नाहीत, मनुष्यबळही नाही. घंटागाड्या खरेदीसाठी आवश्यक निधीही उपलब्ध नाही. कचरा टाकण्यासाठी डंपिंग ग्राऊंडही उपलब्ध नाहीत. अशा अनेक समस्या सध्या ग्रामपंचायतींना भेडसावत आहेत.

जिल्ह्यात नेरळम नागोठणे, गोरेगाव, चेंढरे, वरसोली, वेश्वी, थळ, नागाव, चौल या सारख्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या काही हजारात आहे, मात्र त्या तुलनेत या ग्रामपंचायतींकडे कचरा व्यवस्थापनासाठी सक्षम यंत्रणा उपलब्ध नाही. अलिबाग, उरण, मुरुड आणि श्रीवर्धन तालुक्यातील समुद्र किनाऱ्यांवर असलेल्या ग्रामपंचायतीकडे स्वतःची डंपिग ग्राऊंड उपलब्ध नाही. त्यामुळे ग्रामपंचायती आपला कचरा मोकळ्या जागेत टाकतात किंवा हा कचरा कांदळवन क्षेत्रात टाकला जातो.

घनकचरा व्यवस्थापनाबरोबरच मैला व्यवस्थापनाची समस्यादेखील भविष्यात सतावणार आहे. आता ग्रामीण भगात घरोघरी शौचालय बांधली जात आहेत, पण त्यात साचणाऱ्या मैल्याच्या व्यवस्थापनाकडे कुणी लक्ष देत नाही. या मैल्याचे विघटण करणे आवश्यक आहे. सुक्ष्म पध्दतीने विघटन करावे लागेल. त्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान उपलब्ध केले गेले पाहिजे. या भविष्यात उद्‌भवणाऱ्या समस्या आहेत. भरपूर पाऊस पडूनदेखील जिल्ह्याच्या काही गावांमध्ये टँकरव्दारे पाणीपरवठा करावा लागतो. त्यावर करोडो रुपये दरवर्षी खर्च केले जातात.

वाढती लोकसंख्या विचारात घेऊन पिण्याच्या पाण्यासाठी धरण बांधावी लागतील. प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये पाण्याचा स्रोत बळकट करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. शक्य असेल त्या ग्रामपंचायतींमध्ये स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविणे हा एक चांगला पर्याय होऊ शकेल. गाव तिथे डंपिंग ग्राऊंड, गाव तिथे घंटागाडी यासारख्या योजना राबवाव्या लागणार आहेत. ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रोत्साहित करावे लागणार आहे. या ग्रामपंचायतींमध्ये कचरा व्यवस्थापनासाठी सक्षम यंत्रणा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

# महाडच्या चवदार तळ्याचा वर्धापन दिन : समतेच्या क्रांतीची ऐतिहासिक घटना

रायगड जिल्ह्यातील महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे आजही सामाजिक समतेच्या लढ्याचे तेजस्वी प्रतीक म्हणून उभे आहे. २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सत्याग्रहाने अन्यायाच्या बेड्या तोडत मानवतेचा विजय साजरा केला.या ऐतिहासिक घटनेला यंदा ९९ वर्षे पूर्ण होत असून हा दिवस केवळ स्मरणाचा नाही तर प्रेरणा आणि जागृतीचा आहे.

चवदार तळ्याचा सत्याग्रह हा केवळ पाण्यासाठीचा संघर्ष नव्हता, तर तो स्वाभिमान, समान हक्क आणि मानवी प्रतिष्ठेचा लढा होता. अस्पृश्यतेच्या अमानवी प्रथेला धक्का देत डॉ. आंबेडकरांनी हजारो अनुयायांसह तळ्याचे पाणी प्राशन केले आणि आम्हीही माणूस आहोत हा ठाम संदेश संपूर्ण देशाला दिला. या घटनेने भारतीय समाजव्यवस्थेला हादरा दिला आणि समतेच्या दिशेने मोठी क्रांती घडवली. आजही या क्रांतीभूमीत दरवर्षी लाखो भीम अनुयायी देशाच्या कानाकोपऱ्यातून महाडकडे ओढले जातात.



निळ्या ध्वजांची उंच फडकणारी पताका आणि जय भीमच्या गजरात संपूर्ण शहर भारावून जाते. विविध ठिकाणी उभारलेले पुस्तकांचे स्टॉल, डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे साहित्य, कॅलेंडर, छायाचित्रे हे सर्व केवळ वस्तू नसून एका विचारसरणीचा प्रसार करणारे दीपस्तंभ ठरतात. चवदार तळ्यावर अभिवादन करताना प्रत्येक अनुयायीचा उर अभिमानाने भरून येतो. याच भूमीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेचे प्रतीक असलेल्या मनुस्मृतीचे दहन केले आणि समतेच्या नव्या युगाची मुहूर्तमेढ रोवली. त्या ऐतिहासिक घटनेची साक्ष देणाऱ्या क्रांतीस्तंभाला अभिवादन करण्यासाठी हजारो भीमसैनिक अश्रू भरलेल्या डोळ्यांनी नतमस्तक होतात. तो क्षण प्रत्येकाच्या मनात एक वेगळीच ऊर्जा निर्माण करतो.

महाडच्या रस्त्यांवरून चालताना जाणवणारी ती भावनिक लाट, एकमेकांप्रती असलेली बंधुभावाची भावना आणि बाबासाहेबांच्या विचारांवरील अढळ श्रद्धा हे सर्व दृश्य शब्दांत मांडणे कठीण आहे. ही केवळ जयंती किंवा वर्धापन दिन नसून ती एक चळवळ आहे, एक जागृती आहे आणि समतेच्या लढ्याची अखंड चालणारी परंपरा आहे. आज ९९ वर्षांनंतरही चवदार तळ्याचा संदेश तितकाच जिवंत आणि प्रभावी आहे. समाजात अजूनही असलेल्या विषमतेच्या छटा दूर करण्यासाठी हा इतिहास आपल्याला मार्गदर्शन करतो. शिक्षण,संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा अवलंब करत आपण खऱ्या अर्थाने बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करू शकतो. महाडची ही क्रांतीभूमी प्रत्येकाला एकच संदेश देते. स्वाभिमानाने जगा, समानतेसाठी लढा आणि मानवतेचा मार्ग कधीही सोडू नका महाड चवदार तळे हे केवळ एक ऐतिहासिक स्थळ नसून ते भारतीय लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांचे प्रतीक आहे. या पवित्र भूमीला वंदन करत समानतेच्या या लढ्याची मशाल पुढे नेण्याची जबाबदारी हे प्रत्येक नागरिकाची आहे.

**-आनंद पवार, पत्रकार, पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

## ॲक्टिव्ह असतानाही असे लपवू शकता इन्स्टा स्टेटस

एरवी तुम्ही Instagram वर ॲक्टिव्ह दिसत असताना कोणतेही चॅट, मेसेजेस टाळणे अवघड होऊन बसते, कारण यात तुम्ही ऑनलाईन किंवा अलीकडे ॲक्टिव्ह म्हणून दाखवले जात असल्याचा संदर्भ येतो. अशावेळी तुमच्या कामात व्यत्यय येऊ शकतो तेंव्हा, तुम्ही Instagramवर तुमचे स्टेटस कसे लपवू शकता याबद्दल येथे माहिती देत आहोत.




तुम्ही इन्स्टाग्रामवर एखाद्याला टाळत असाल किंवा फक्त कामावर लक्ष केंद्रित करू इच्छित असाल आणि मित्राने शेअर केलेल्या मीममुळे तुम्हाला त्रास नको असेल तर Instagram मध्ये एक फीचर आहे जे या परिस्थितीत उपयुक्त ठरू शकते. इंस्ट्राग्राम आता युजर्सना Instagram वर ऑफलाईन दिसण्याची परवानगी देते. हे फीचर तुम्हाला प्रायव्हसी देते. अनैच्छिक मेसेज टाळण्यास मदत करते आणि युजर्सना त्यांच्या ऑनलाईन उपस्थितीवर कंट्रोल घेऊ देते.

तुम्ही तुमची इन्स्टाग्राम ॲक्टिव्हिटी प्रायव्हेट ठेवू इच्छित असल्यास, तुमचे ऑनलाइन स्टेट्स लपवणे ही एक स्मार्ट ट्रिक आहे. Android आणि iOS युजर्ससाठी येथे एक साधे मार्गदर्शक आहे : Instagram ॲप उघडा. तळाशी उजव्या कोपऱ्यात असलेल्या तुमच्या प्रोफाइल चित्रावर टॅप करा. 'मेसेज आणि स्टोरी रिप्लाय' वर टॅप करा. 'व्हू कॅन सी यू आर ऑनलाईन' अंतर्गत, तुम्हाला 'ॲक्टिव्ह स्टेटस दाखवा' दिसेल. तो टॉगल बंद करा.

तुम्ही मोबाईल ब्राउझरवर Instagram वापरत आहात? काळजी नाही. तुम्ही अजूनही क्टिव्ह स्टेटस लपवू शकतात. तुमच्या मोबाईल ब्राउझरवर Instagram उघडा. तळाशी उजवीकडे प्रोफाइल चिन्हावर टॅप करा. वरती डावीकडे 'गियर' चिन्हावर टॅप करा. 'मेसेज आणि स्टोरी रिप्लाय' वर टॅप करा. 'व्हू कॅन सी यू आर ऑनलाईन' अंतर्गत, तुम्हाला 'ॲक्टिव्हिटी स्टेटस दाखवा' दिसेल. 'ॲक्टिव्ह स्टेटस दाखवा' टॉगल बंद करा.

तुम्ही तुमच्या लॅपटॉपवर इन्स्टाग्राम सर्फिंग करता का? तरीही तुम्ही तुमचे क्टिव्ह स्टेटस सहज लपवू शकता. तुमच्या वेब ब्राउझरवर Instagram उघडा. उजवीकडे वरच्या बाजूला प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करा. 'व्ह्यू आर्किव्ह' च्या पुढील 'सेटिंग्ज' वर क्लिक करा. 'सेफ्टी अँड प्रायव्हसी' निवडा. खाली स्क्रोल करा आणि 'मेसेज व स्टोरी आन्सर' निवडा. 'ॲक्टिव्ह स्टेटस दाखवा'वर क्लिक करा तो टॉगल बंद करा.

# मराठी नवकाव्याचे प्रवर्तक बा.सी. मर्ढेकर

**निमित्त**



मराठी नवकाव्याचे प्रणेते बाळ सीताराम मर्ढेकर उर्फ बी.सी. मर्ढेकर यांचा जन्म १ डिसेंबर १९०९ रोजी झाला. सातारा जिल्ह्यातील मर्ढे हे मर्ढेकरांच्या घराण्याचे मूळगाव. मूळ आडनाव गोसावी असले तरी गावाच्या नावावरून मर्ढेकर हे आडनाव रूढ झाले. मर्ढेकरांचे प्राथमिक शिक्षण बहाद्दरपूर येथे तर माध्यमिक शिक्षण फैजपूर सावदे येथे झाले. तसेच धुळ्याच्या गरूड हायस्कूलमध्येही त्यांचे शिक्षण झाले. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी बीएची पदवी घेतली. १९३४ साली 'टाइम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राच्या संपादकीय विभागात काही दिवस त्यांनी नोकरी केली. पुढे मात्र एलफिस्टन महाविद्यालय, ईस्माइल युसूफ कॉलेज आणि सीडन हॅम कॉलेज अशा मुंबईच्या महाविद्यालयात त्यांनी इंग्रजीचे अध्यापन केले.

सुरुवातीच्या काळात इंग्लिश भाषेचे प्राध्यापक म्हणून अल्प काळ नोकरी करून नंतर त्यांनी 'ऑल इंडिया रेडिओ'वर दीर्घ काळ नोकरी केली. कवी म्हणून मर्ढेकरांना मराठी वाङ्मयात युगप्रवर्तकाचं स्थान दिलं जातं. मर्ढेकरांनी मराठी कवितेत आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगानी क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणले. यंत्रयुगातील गतिमानतेत माणुसकी हरपत चालल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी कवितेबरोबरच काही कादंबऱ्या आणि संगीतिकाही लिहिल्या होत्या. मर्ढेकरांचे लेखन हे युद्धोत्तर काळातील नव्या जाणिवा व नव्या युगाची जाणीव व्यक्त करणारे होते.

मर्ढेकरांच्या शिशिरागम ह्या पहिल्या काव्यसंग्रहातील कवितांवर रविकिरण मंडळाची विशेषतः त्यातील माधव ज्यूलियन् यांची छाया दिसून येते. तथापि काही कविता आणि आणखी काही कविता या दोन संग्रहांच्या शीर्षकांप्रमाणेच त्यांतील कविताही वेगळ्या आहेत. अनेक पूर्वसूरींचे संस्कार पचवून त्यांतून स्वतःच्या कवितेचे अस्सल रसायन त्यांनी तयार केले आहे. जोष, ठसठशीतपणा, पुरूषी थाट आणि निर्भीडपणा ही ह्या कवितेची काही वैशिष्ट्ये रामदांसाकडून आलेली आहेत. तर शब्दांची मोडतोड, प्रतिमांची जुळवाजुळव, धक्का देणाऱ्या दोन विभिन्न कल्पनांची सांगड घालणे, ह्या गोष्टी हॉपकिन्झ, टी.एस. एलियट ह्यांसारख्या कवींशी त्यांचा जवळचा संबंध दर्शवणाऱ्या आहेत.

मर्ढेकरांच्या कवितेतून निराशा व वैफल्य प्रगट होते बा.सी. मर्ढेकर हे भाषा प्रभू होते. त्यांच्या काव्यात आशय आणि अभिव्यक्ती यांचा सुसंवाद आढळतो. परंपरागत सांकेतिक उपमान व प्रतिमा न वापरता त्यांनी नव्या प्रतिमांचा उपयोग केला त्याचबरोबर ते आपल्या अनुभूतींशी प्रामाणिक राहीले. मर्ढेकरांचे काव्य वेदनेचे काव्य आहे. बा.सी.मर्ढेकर हे मराठीतील नवकवितेचे आद्य प्रवर्तक म्हणून ओळखले जातात. केशवसुतांनंतरचे मराठीतील एक युगप्रवर्तक कवी म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो.

रात्रीचा दिवस, तांबडी माती, पाणी यांसारख्या त्यांच्या कादंबऱ्यासुद्धा प्रसिद्ध आहेत तसंच त्यांचं 'नटश्रेष्ठ' हे नाटकही प्रसिद्ध आहे. त्यांना १९५६ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. २० मार्च १९५६ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

## उन्हाळ्यात 'या' पालेभाजीचा आहारात करा समावेश

आपल्या आहारामध्ये पालेभाज्या तसंच फळभाज्यांचा समावेश असावा, कारण या उन्हाळ्याच्या ऋतूत तुमच्या शरीराला थंड ठेवतात. पालक, मेथी या हिरव्या पालेभाज्या तर आपण खातोच. पण, उन्हाळ्यात कुल्फा म्हणजेच घोळाची भाजीदेखील खाणे आवश्यक आहे.



पोषणतज्ज्ञ लीमा महाजन यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे आणि या भाजीबद्दल अधिक माहिती दिली आहे. तसेच द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना नारायण हॉस्पिटल गुरुग्रामच्या आहारतज्ज्ञ मोहिनी डोंगरे व धर्मशिला नारायणा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ पायल शर्मा यांनी या भाजीचे काही आरोग्यदायी फायदे सांगितले आहेत. तर कुल्फा ज्याला purslane किंवा portulaca oleracea म्हणजेच घोळाची भाजी म्हणूनही ओळखले जाते. ही एक रसाळ पालेदार हिरवी भाजी आहे, जी अनेक भागांमध्ये विशेषतः उन्हाळ्याच्या महिन्यांत जास्त आढळते. धर्मशिला नारायणा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ पायल शर्मा यांनी सांगितले की, ही भाजी अत्यंत पौष्टिक आहे आणि विशेषत: उष्ण हवामानात या रसाळ भाजीचे सेवन करण्याचे अनेक फायदे आहेत.

उन्हाळ्यात घोळाची भाजी खाण्याचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे शरीराला हायड्रेट ठेवणे. डॉक्टर शर्मा यांच्या म्हणण्यानुसार, यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे उन्हाळ्यात शरीराबाहेर जो घाम बाहेर पडतो तो भरून काढण्यास मदत होते. शरीर थंड राहते व निर्जलीकरण टाळता येते. याशिवाय घोळाची भाजी उष्माघात आणि घामोळे यासारख्या उष्णतेशी संबंधित आजारांवर एक पारंपरिक उपाय ठरते. कुल्फा म्हणजेच घोळाच्या भाजीचे सेवन करण्यापूर्वी त्यावरील घाण अथवा कीड लागलेली पाने काढून टाकून ती पूर्णपणे स्वच्छ धुवून घ्या. नारायणा हॉस्पिटल गुरुग्रामच्या आहारतज्ज्ञ मोहिनी डोंगरे यांच्या मते, घोळाची भाजी सॅलेडमध्ये तुम्ही कच्ची खाऊ शकता. तसेच स्टिर-फ्राइज, सूप किंवा करी यांसारख्या विविध पदार्थांमध्ये ही भाजी घालून तुम्ही याचे सेवन करू शकता. या भाजीची किंचित तिखट चव कोणत्याही पदार्थाला स्वादिष्ट बनवते. त्यामुळे तुम्ही या भाजीचा वेगवेगळ्या पाकृतींसह प्रयोग करून पाहू शकता. घोळाच्या भाजीचा आहारात समावेश केल्याने हृदयाचे आरोग्य, पचन तर एकूणच तुमचे आरोग्य सुधारू शकते; असे डॉक्टर मोहिनी डोंगरे यांचे म्हणणे आहे. तर आपण या लेखातून घोळाची भाजीचा आहारात समावेश करण्याचे फायदे पाहिले.

# कर्जत शहरात हॉटेल व्यवसाय संकटात; तहसीलदारांना निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

वाणिज्य गॅस सिलेंडरचा तुटवडा असल्याने कर्जत शहरातील हॉटेल व्यवसाय संकटात आला आहे. हॉटेल व्यवसाय यांच्यासाठी आवश्यक असलेले एल पी जी गॅस सिलेंडर बाजारात उपलब्ध नसल्याने काही हॉटेल व्यवसायिकांना हॉटेल बंद ठेवावी लागत आहेत. त्यामुळे काही दिवसात हॉटेल व्यवसाय बंद पडण्याची शक्यता आहे. हॉटेल व्यवसायिक यांनी कर्जत तहसीलदार यांची भेट घेत आपली कैफियत मांडली असून लवकरात लवकर गॅस सिलेंडरचा पुरवठा करावा अशी मागणी केली आहे.



कर्जत नगरपरिषद हद्दीतील कर्जत – दहिवली परिसरात गेल्या आठवडाभरापासून गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. एल पी जी गॅस सिलेंडर टाक्या उपलब्ध होत नसल्याने येथील हॉटेल व्यवसाय अक्षरशः ठप्प झाला आहे. कर्जतची ओळख असलेल्या सर्वसामान्यांच्या आवडीच्या वडापाव सारख्या पदार्थांच्या विक्रीवरही याचा मोठा परिणाम झाला आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडर उपलब्ध नसल्याने अनेक लहान – मोठी हॉटेल्स बंद ठेवण्याची वेळ आली असून, कामगारांच्या उदरनिर्वाहावरही संकट ओढावले आहे. अनेकांचे संसार देखील उघड्यावर पडण्याची वेळ हॉटेल व्यावसायिकांच्यावर आली आहे. या पार्श्वभूमीवर कर्जत–दहिवली हॉटेल असोसिएशनच्या वतीने कर्जत येथील प्रशासकीय कार्यालयातील पुरवठा विभाग तसेच तहसिलदार डॉ. धनंजय जाधव यांना निवेदन सादर करण्यात आले.

गेल्या आठवड्यापासून गॅस सिलेंडरचा पुरवठा खंडित झाल्यामुळे व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हॉटेल व्यावसायिकांवर भाडे, वीजबिल, तसेच बँक कर्जाच्या हप्त्यांचा आर्थिक ताण वाढत आहे. पर्यायी मार्गाने सिलेंडर मिळविण्याचा प्रयत्न केल्यास दंडात्मक कारवाईचा धोका असल्याने अडचणी अधिकच गंभीर झाल्या आहेत. त्यामुळे तातडीने गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तहसिलदार डॉ. धनंजय जाधव यांनी निवेदनाचा स्वीकार करत हॉटेल व्यावसायिकांना दिलासा दिला असून आपण स्वतः रायगड जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करणार असल्याचे सांगितले

# माणगाव पंचायत समितीमध्ये पदे रिक्त

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव पंचायत समितीमध्ये नव्या सभापती व उपसभापतींची निवड झाली असली तरी त्यांच्या पुढे उभे असलेले प्रश्न मात्र जुनेच आणि अधिक गंभीर स्वरूपाचे असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.




पंचायत समितीची मुदत मार्च २०२२ मध्ये संपल्यानंतर तब्बल चार वर्षांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये निवडणुका पार पडल्या. त्यानंतर मार्च मध्ये सभापती व उपसभापती पदांच्या निवडणुका होऊन शिवसेनेचे विलास शिंदे यांची सभापती पदी, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या मनीषा मालुरे यांची उपसभापती पदी बिनविरोध निवड झाली. नव्या नेतृत्वाकडून विकासाच्या अपेक्षा उंचावल्या असल्या, तरी प्रत्यक्षात परिस्थिती अत्यंत आव्हानात्मक आहे.चार वर्षे लोकप्रतिनिधींच्या अभावामुळे विकास ठप्प झाला होता.माणगाव तालुक्यातील २१ ग्रामपंचायतींची मुदत दोन वर्षांपूर्वीच संपली असून त्या ठिकाणी अद्याप निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत. परिणामी, या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त असून स्थानिक नेतृत्व असणाऱ्या लोकप्रतिनिधीचा पूर्णतः अभाव आहे. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी वेळेत उपलब्ध झाला नाही आणि गेली चार वर्षे अनेक विकासकामे रखडली. कारभारीच नाही, तर विकास कसा होणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

त्यामुळे दिवसेंदिवस मूलभूत सुविधांचा प्रश्न गंभीर बनला होता. तालुक्यातील ७४ ग्रामपंचायती मधील नागरिक आजही मूलभूत सुविधांसाठी झगडत आहेत. अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठ्याची समस्या, अपूर्ण पाणीपुरवठा योजना, गटारे, सार्वजनिक शौचालयांची कमतरता, पथदिव्यांचा अभाव, स्मशानभूमींची दुरावस्था, अपुऱ्या आरोग्य सुविधा, रायगड जिल्हा परिषदांच्या शाळांची जीर्ण अवस्था, तसेच नव्याने शाळा बांधण्याच्या कामातील अडचणी, या सर्व समस्यांमुळे गावा गावातील विकास कामे अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र दिसत आहे.

प्रशासनावर कामाचा प्रचंड ताण वाढत असून पंचायत समितीतील शिक्षण, आरोग्य, बांधकाम, पाणीपुरवठा, ग्रामपंचायत, समाजकल्याण आणि कृषी अशा महत्त्वाच्या विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत.

एकाच अधिकाऱ्यावर दोन–दोन विभागांचा कार्यभार सोपवला जात असल्याने कामाचा ताण वाढला असून, निर्णय प्रक्रियेत विलंब, कामांच्या गुणवत्तेत घट, नागरिकांच्या तक्रारींमध्ये वाढ, अशा समस्या प्रकर्षाने जाणवत आहेत. 'एक अधिकारी आणि तो ही दोन विभागाचा प्रभारी' अशी अवस्था आहे. शासनाकडून मिळणारा निधी अपुऱ्या प्रमाणात मिळत असल्याच्या तक्रारी कायम असताना, नागरिकांच्या मूलभूत सोयी सुविधांसाठी अधिकाधिक निधी मिळवून देऊन विकास कसा करता येईल यावर नवनिर्वाचित सभापती उपसभापती पुढे मोठे आव्हान उभारणार आहे.

# मुरूडमध्ये नववर्षाचे स्वागत बाईक रॅलीने

**मुरुड : प्रतिनिधी**

गुढीपाडवा हा महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे, जो मराठी नववर्षाची सुरुवात दर्शवतो. हा दिवस चैत्र शुद्ध प्रतिपदेला साजरा केला जातो आणि त्याचे धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे.



भगवान श्रीराम रावणावर विजय मिळवून अयोध्येत परतले, त्या दिवशी गुढी पाडवा साजरा केला जातो. हा सण समाजातील एकता आणि सांस्कृतिक वारसा जपण्याची प्रेरणा देतो. घराच्या प्रवेशद्वारावर गुढी उभारली जाते, जी विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे.

मुरुडमध्ये ही मराठी नववर्षाचे स्वागत करिता विविध सांस्कृतिक धार्मिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या वर्षी ही कुणाल सतविडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुढीपाडव्यानिमित्त हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी हिंदू तरुणांनी भगवा फेटा व पारंपरिक पोशाखात हातात भगवे झेंडे घेऊन कोटेश्वरी माते की जय जय भवानी जय शिवाजी च्या घोषणांनी नववर्षाचं स्वागत केलं.आणि प्रत्येकाला शुभेच्छा दिल्या. आणि शहरा मध्ये मोटार सायकल रॅली काढण्यात आली .या रॅलीमध्ये प्रत्येकांनी भगवे वस्त्र परिधान करून मोटार सायकला भगवे झेंडे लावुन कोटेश्वरी माते की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव जय श्रीरामच्या घोषणा देत शांततेच्या मार्गाने ही रॅली मुरुड कोटेश्वरी मंदिरापासून ते शहरातील विविध ठिकाणी रॅली काढण्यात आली.

यावेळी कुणाल सतविडकर,रूपेश जामकर, प्रमोद भायदे,आदेश दांडेकर, आशिलकुमार ठाकुर, राहुल कासार, योगेश सुर्वे, महेंद्र मोहिते, आकाश खोत,सिध्देश खेडेकर,सतेज विरुकुड, प्रशांत कासेकर, अमित गोंजी आदिंसह तरुण वर्ग नागरिक सहभागी झाले होते.

# नागोठण्यात नववर्षाचे उत्साहात स्वागत

**नागोठणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या गुढीपाडवा सणानिमित्त नागोठणे शहरात सर्वत्र आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. घरोघरी गुढी उभारून नागरिकांनी मराठी नववर्षाचे उत्साहात स्वागत केले.पहाटेपासूनच नागरिकांनी आपल्या घरांसमोर सुंदर रांगोळ्या काढून गुढी उभारली. गुढीला रेशीम वस्त्र, फुले, कडुलिंब, साखरगाठी आणि कलशाने सजवून शुभतेचे प्रतीक मानले गेले. नवीन कपडे परिधान करून कुटुंबीयांनी एकत्र येत सण साजरा केला.

या निमित्ताने शहरातील विविध मंदिरांमध्ये विशेष पूजा व आरतीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच पारंपरिक वेशभूषा परिधान करून नागरिकांनी सण साजरा केला.गुढीपाडव्याच्या निमित्ताने नागरिकांनी एकमेकांना शुभेच्छा देत नव्या वर्षाच्या स्वागताचा आनंद लुटला.



# सिप्ला फाऊंडेशनकडून विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रम राबविणारे व त्यातून देशाच्या उज्वल भविष्यासाठी महत्वाचे उपक्रम राबविणारे गुणवंत विद्यार्थी यांचा गुणगौरव सिप्ला फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थी यांना पुढील शैक्षणिक काळासाठी उर्जा मिळाली.



पंचायत समिती खालापूर यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषदेच्या शाळा साजगाव येथे अतिशय उत्कृष्ट नियोजन करून विद्यार्थी यांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी उपक्रम राबविण्यात आला होता. इयत्ता पहिली ते आठवी च्या विद्यार्थी यांनी गुणवत्ता विकास स्पर्धा यात सहभाग घेतला. विद्यार्थी यांची गुणवत्ता सिप्ला फाऊंडेशन यांच्या वतीने तपासण्यात आली. गुणवत्ता विकास स्पर्धे साठी सिप्ला फाऊंडेशन यांच्या वतीने फाउंडेशनचे एच.आर. प्रमुख विकास शिंदे, सहकारी सनी म्हात्रे यांनी स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या तालुक्यातील १०३ विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे, भेट वस्तू व प्रशिस्त पत्र देऊन गौरविण्यात आले.

खालापूर तालुक्यात सर्वाधिक पारितोषिक प्राप्त शाळा साजगाव यांना जनरल चॅम्पियनशीप देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे,उपसभापती भाई शिंदे, रायगड जि.प.सदस्या रेश्मा पाटील,पंचायत समिती सदस्यता देवयानी देशमुख, गटशिक्षणाधिकारी दीपा परब, आदींसह सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक सुरेश चव्हाण,स्पर्धक विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

विद्यार्थी यांची गुणवत्ता वाढीसाठी सिप्ला फाऊंडेशन यांनी सहकार्य केल्याबद्दल मुख्याध्यापक सुरेश चव्हाण यांनी आभार व्यक्त केले. चिमुकल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केल्याबद्दल सिपला फाउंडेशनचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# नागोठणे पत्रकार असोसिएशनचा आज वर्धापन दिन समारंभ

**नागोठणे : प्रतिनिधी**

गेल्या तेरा वर्षांपासून सातत्याने आपला वर्धापन दिन नित्यनियमाने साजरा करून रायगड जिल्ह्यासह नागोठणे शहर व ग्रामीण विभागात नावलौकिक मिळविलेल्या नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचा चौदावा वर्धापन दिन सोहळा शुक्रवार दि. २० मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या प्रांगणात संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व रायगडचे लोकप्रिय खासदार सुनील तटकरे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत तसेच रजिपचे उपाध्यक्ष मधुकरशेठ पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याची माहिती पत्रकार असोसिएशनचे सचिव अनिल पवार यांनी दिली. कार्यक्रमासाठी पत्रकार असोसिएशनकडून जय्यत तयारी करण्यात आली असून दापोली (जि. रत्नागिरी) येथील पत्रकार यशवंत कांबळे यांना कै. तात्यासाहेब टके ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार, पनवेल येथील पत्रकार प्रशांत शेडगे यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार तर माणगाव येथील पत्रकार परेश शिंदे यांना युवा पत्रकार पुरस्कार खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत.

नागोठणे शहर व ग्रामीण विभागासह रायगड जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व गुणवंत विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे या कार्यक्रमाला रजिप सदस्य सुमितदादा काते, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन, नरेंद्रशेठ जैन उपस्थित राहणार आहेत.

# युवा नेते निलेश थोरे यांची कलिंगड उत्पादकांच्या समस्यांवर जि.प. सीईओ डॉ.नेहा भोसलेंशी चर्चा

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे दक्षिण रायगड युवामोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी माणगांव तालुक्यातील कलिंगड उत्पादकांच्या विविध समस्यांबाबत रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.नेहा भोसले यांची भेट घेतली.यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष परेशजी सांगळे उपस्थित होते.



कलिंगड उत्पादकांना सामोरे जावे लागत असणाऱ्या विविध अडचणींबाबत चर्चा करण्यात आली,अनेकवेळा काही बोगस कंपन्या शेतकऱ्यांना कमी भावात कलिंगड लागवडीकरिता रोपं,औषधे, खते उपलब्ध करून देतात आणि नंतर शेतकऱ्यांना फार मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागते. सदरची रोपं,औषधे खरेदी केल्यावर कोणतेही पक्के बिलं न दिल्यामुळे नुकसान झाल्यावर शेतकऱ्यांना कोणत्याही भरपाईकरीता दाद मागता येत नाही.अनोंदणीकृत बनावट कंपन्या शेतकऱ्यांना भेटून कमी पैशात निकृष्ट दर्जाच्या रोपांची व खतांची विक्री करतात


## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे–खोपटे, (कचेरपाडा), ता–उरण, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**– मिळकतीचे वर्णन –**

**मौजे : उरण (कचेरपाडा), तालुका– उरण, जिल्हा –रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| खोपटे, (कचेरपाडा) | १ विश्वनाथ रघुनाथ भगत रा. खोपटे, ता. उरण, जि. रायगड | ९३/३ | ०.१८.७० ०.००.०० ०.१८.७० हे. आर. पॉ. | २.७५ |
| | | एकुण | ०.१८.७० | |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०३/२०२६

**सही/–**
**ॲड. सरिता महेंद्र साखरे**
**पत्ता– ०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं.१२, सेक्टर ०५, नवीन पनवेल ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.**




**मुरुड : साडेतीन मुहुर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्यानिमित्ताने लहान मुलांनी सकाळी नवीन कपडे घालून गुढीचे पूजन केले.** (छाया : सुधीर नाझरे)

# माणगाव येथील जामा मशिदीचे उद्घाटन, इफ्तार पार्टी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथे नव्याने साकारलेल्या जामा मशिदीच्या इमारतीचा उदघाटन सोहळा बुधवार दि.१८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी माणगाव तालुक्यातील वडवली गावचे प्रसिद्ध मुफ्ती हुसेन अब्दुलरहीम हरगे यांच्या विशेष उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.



या जामा मशिदीच्या उदघाटन सोहळ्यानिमित्त आयोजित इफ्तार पार्टी कार्यक्रमास मुस्लिम व हिंदू बांधवांची मोठी उपस्थिती होती. या जामा मशीद इमारतीच्या उदघाटन सोहळ्यानिमित्त मस्जिद मोहल्ला माणगाव येथील मुस्लिम बांधवांमध्ये आनंदाचे वातारण निर्माण झाले होते. जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथे नव्याने साकारलेल्या जामा मशिद इमारतीमुळे माणगावच्या वैभवात निश्चितच आणखी एक भर पडली आहे.

या जामा मशीद इमारतीचे काम मुस्लिम समाजातील एका दानशूर व्यक्तीने स्वखर्चाने अल्लाहला साक्षी ठेवत अत्यंत देखण्या स्वरूपात करून भव्य अशी इमारत या मशिदीची उभारण्यात आली आहे. गेली तीन वर्ष या जामा मशिदीच्या इमारतीचे काम सुरु होते. या मशिदीचा उदघाटन सोहळा बुधवारी सायंकाळी असरच्या नमाजीदरम्यान मुफ्ती हुसेन अब्दुलरहीम हरगे यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मुफ्ती हुसेन अब्दुलरहीम हरगे यांनी इस्लाम धर्माची तत्वे व शिकवण या विषयावर व्याख्यान दिले. या मशिदीच्या उदघाटनपर कार्यक्रमास रायगड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते. या सर्वांचे मोहल्ल्याचे अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजीते व उपाध्यक्ष सिराज अफ़वारे तसेच मस्जिद मोहल्ला ग्रामस्थांनी यथोचित स्वागत केले.

# कमळ पतसंस्थेने गाठला १००६ कोटींच्या एकत्रित व्यवसायाचा टप्पा

**अलिबाग : प्रतिनिधी**



कमळ नागरी सहकारी पतसंस्थाने १००६ कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसायाचा टप्पा गाठला आहे. जिल्हास्तरीय कार्यक्षेत्र असताना १००० कोटी रूपयांपेक्षा जास्त एकत्रीत व्यवसाय कराणारी कमळ ही रायगड जिल्ह्यातील पहिली पतसंस्था आहे, अशी महिति पतसंस्थेच अध्यक्ष नंदकुमार चाळके यांनी दिली.

कमळ पतसंस्थेच्या डॉ. हेडगेवार सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत चाळके बोलत होते. पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे, माजी अध्यक्ष सतीश पाटील यावेळी उपस्थित होते.

कमळ पतसंस्थेची स्थापना ४ एप्रिल १९९२ रोजी झाली. त्यावेळी केवळ ३० हजार रुपये ठेवी होत्या. १८ मार्च २०२६पर्यंत पतसंस्थेच्या ५६४ कोटी ४४ लाख रुपये ठेवी असून ४३१ कोटी ५६ लाख रुपये कर्ज वाटप करण्यात आले आहे. एकत्रित व्यवसाय १००६ कोटी रुपये, भाग भांडवल २४ कोटी आठ लाख रुपये, सदस्य संख्या ४५ हजार, स्वनिधी ४५ कोटी ७७ लाख रुपये, सीडी रेशो ७३.१२ टक्के आहे.

पतसंस्थेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे असून अलिबाग, नागाव, सरसवणे, वावे, महाड, पोयनाड, तळा, रोहा, कर्जत, माणगाव, पेण, काशिद, नेरळ, बिरवाडी, वावोशी आदी १६ शाखा आहेत. चार पतसंस्थांचे 'कमळ'मध्ये विलिनीकरण करण्यात आले आहे. आमचे कार्यक्षेत्र केवळ रायगड जिल्ह्यात आहे. तरीदेखील आम्ही १००० कोटींपेक्षा जास्त एकत्रित व्यवसाय केला आहे. लवकरच आम्ही मुंबईत शाख सुरू करू, अशी महिति गिरीश तुळपुळे यांनी दिली.

कमळ पतसंस्थेने अलिबागमध्ये १० गुंठे जागा विकत घेतली आहे. येथे मुख्यालय उभारण्यात येणार आहे. त्याचा पायभरणी समारंभ लवकरच केला जाईल. त्यापूर्वी २१ मार्च रोजी या जागेवर धार्मिक विधी केला जाणार आहे. त्याच दिवशी या जागेवर सभासद मेळावा घेण्यात येणार आहे. चांगले काम करणाऱ्या सहसंस्थांना या कार्यक्रमात 'कमळ'तर्फे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. सायंकाळी ६ वाजता जयमाला गार्डन अलिबाग येथे सहकार स्वरसंध्या हा मराठी भावगितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष चाळके यांनी दिली.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी तब्बल २१ वर्षांनी जेरबंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

बकरी मारल्याच्या संशयातून खून करून तब्बल २१ वर्षे फरार असलेल्या आरोपीला पोयनाड पोलिसांनी पनवेल येथून मोठया शिताफीने जेरबंद केले. मनोज अशोक पांडव असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

खुनाची ही घटना २००४ साली अलिबाग तालुक्यातील घेरासागरगड वडवली येथे घडली होती. आरोपी मनोज पांडव याची बकरी वडवली गावात गणेश ठाकूर यांच्या आवारात मृतावस्थेत आढळून आली होती. प्रसाद ठाकूर यानेच आपली बकरी मारल्याचा संशय मनोज पांडव याला होता. त्यावरून मनोज याने प्रसाद ठाकूर याच्याविरोधात अलिबाग न्यायालयात केस दाखल केली होती. या प्रकरणातून दोघांमध्ये वैमनस्य निर्माण झाले. याच रागातून मनोज पांडव याने २ एप्रिल २००४ रोजी रात्रीच्या सुमारास प्रसाद ठाकूर याला एकटे गाठून त्याच्यावर धारदार शस्त्राने वार केले. या प्रकरणी गणेश ठाकूर यांच्या फिर्यादीवरून पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्हयातील एक आरोपी जयप्रकाश उर्फ जयेश म्हात्रे (रा. उसर्ली) याच्याविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले, पण या गुन्ह्यातील फरार आरोपी मनोज पांडव २१ वर्षे पोलीसांना गुंगारा देत होता, मात्र अखेर पोयनाड पोलीसांना त्याचा सुगावा लागला. तांत्रिक माहितीच्या आधारे मनोज पांडव याला पनवेल येथील राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पोयनाडचे सहायक निरीक्षक सुजित गडदे, हवालदार मंगेश लांगी, राकेश मेहतर, शिपाई किशोर चव्हाण यांच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली. आरोपी मनोज पांडव यांला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला २० मार्चपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# ५० लाखांच्या थकबाकीमुळे कर्जतमधील सिनेमागृह सील!

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत नगर परिषदेकडून थकबाकीदारांविरोधात सुरू असलेल्या कारवाईत बुधवारी १८ मार्च रोजी शहरातील राजनोवा सिनेमागृहाला टाळे ठोकण्यात आले. सुमारे ५० लाख रुपयांच्या थकबाकीमुळे ही कारवाई करण्यात आली आहे.

नगर परिषद पथकाने सिनेमागृहातील बुकिंग कार्यालय बंद करून संपूर्ण थिएटर सील केले आहे. त्यामुळे प्रदर्शित होणाऱ्या 'धुरंदर २' चित्रपटासाठी आगाऊ बुकिंग केलेल्या ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. कर्जत शहरातील हे एकमेव सिनेमागृह असल्याने चित्रपटप्रेमींमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

कर्जत नगरपरिषदेचे कर निरीक्षक शशांक तळवटकर, सहाय्यक कर निरीक्षक राहुल महाडिक, शीतल सावंत, दीपिका सराई, वसुली लिपीक हृदयनाथ गायकवाड, रुपेश पाटील, रितेश मिसाळ आदींच्या पथकाने कारवाई केली. नगर परिषद कर विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५च्या कलम १५२ अंतर्गत ही कारवाई केली. संबंधित नोटिसनुसार मालमत्ता कर व इतर कर मिळून सुमारे ५३ लाख रुपयांची थकबाकी असून एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीतील देय रक्कम भरलेली नव्हती. वारंवार सूचना देऊनही थकबाकी न भरल्याने अखेर जप्तीची कारवाई करण्यात आली.

काही दिवसांपूर्वी इब्सार महाविद्यालयावरसुद्धा कर्जत नगर परिषदेने कारवाई केली होती, मात्र काही थकबाकी भरल्यानंतर ती जप्ती मागे घेत कारवाई थांबवण्यात आली तसेच दहिवली येथील पशुखाद्याचा कारखानासुद्धा थकबाकीदार असल्याने नगर परिषदेने त्यांच्यावरदेखील कारवाई करण्यास केली आहे. नगर परिषदेकडून मोठ्या थकबाकीदारांवर कारवाईची मोहीम सुरू असून पुढील काळात अन्य व्यावसायिक तसेच निवासी थकबाकीदारांवरही अशीच कडक कारवाई होणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# आपत्कालीन परिस्थिती आणि महसूल विषयावर कार्यशाळा



**चौक : प्रतिनिधी**

युद्धजन्य परिस्थिती, शेत, रस्ते याची माहिती देण्यासाठी खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी खालापूर पंचायत समिती सभागृहात बैठक आयोजित केली होती. तहसीलदार अभय चव्हाण यांनी तालुक्यातील सर्व विभागप्रमुख, सर्व ग्रामस्तरीय अधिकारी यांची बैठक पंचायत समिती सभागृहात घेऊन माहिती दिली.

मुख्यमंत्री–बळीराजा पाणंद शेतरस्ते यांचे प्रस्ताव तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश दिले.यामुळे वर्षानुवर्ष रस्त्यापासून वंचित राहिलेला शेतकरी आपल्या शेतात जाऊ शकत आहे. खालापूर तालुक्यात संभाव्य पाणीटंचाई यावर उपाययोजना करून त्याची प्रभावी कामगिरी करणे.याबाबत प्रत्यक ग्रामपंचायत यांनी टंचाईबाबत माहिती देण्यासंदर्भात सूचना करण्यात आली. यावर गटविकास अधिकारी संदीप कराड, सभापती कृष्णा पारंगे, उपसभापती भाई शिंदे यांनीही सूचना करून मार्गदर्शन केले. अमेरिका इराण युद्धजन्य पार्श्वभूमीवर घरगुती एलपीजी सिलेंडरचा असणारा तुटवडा, अथवा होणारी टंचाई यावर करावयाची उपाययोजना याबाबत माहिती देण्यात आली. अफवांवर विश्वास ठेवू नका असे आवाहन करण्यात आले.

यावेळी गटविकास अधिकारी संदीप कराड, सभापती कृष्णा पारंगे, उप सभापती भाई शिंदे, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, सह गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे, पाणीपुरवठा उपअभियंता संतोष चव्हाण, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल यांच्यासह विविध खात्याचे अधिकारी, ग्रामप्रतिनिधी, सरपंच उपस्थित होते.

# धनगर समाज संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी अनंता हिरवे

**खालापूर : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा हर हर चांगभले धनगर समाज संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी अनंता हिरवे यांची तसेच जिल्हा कार्यकारिणीही घोषित करण्यात आली.

यामध्ये कार्याध्यक्ष व कायदेशीर सल्लागारपदी ॲड. संतोष आखाडे, विठ्ठल आखाडे, उपाध्यक्ष बाळासाहेब आखाडे, सहउपाध्यक्ष ॲड. गणेश आखाडे, सचिव संपत ढेबे, खजिनदार रामदास कोकरे, सहखजिनदार नारायण बोडेकर, संघटक नथुराम ढेबे, प्रसिद्धी प्रमुख दत्तात्रय शेडगे, जिल्हा युवक अध्यक्ष हरेश ढेबे, उपाध्यक्षपदी रवींद्र बोडेकर, सदस्यपदी भागू बोडेकर, बबन हिरवे यांची निवड झाली आहे.

# सुरक्षा सप्ताहाची सांगता, पथनाट्य ठरले प्रभावी

**धाटाव : प्रतिनिधी**



भविष्यात विविध संकटांना सामोरे जावे लागणार आहे. औद्योगिक क्षेत्रातही रोज घडणाऱ्या उलथापालथ, युद्धजन्य परिस्थिती स्वीकारत मार्ग काढावा लागणार आहे. अशा मोठ्या संकटात आपली विविध बांधीलकी अधिक सक्षम ठरायला हवी. कामगार क्षेत्र म्हणून जबाबदारी वाढत आहे. सुरक्षा महत्त्वाची आहे. अपघाती घटना, आगी का लागतात याची मीमांसा व्हायला हवी. एकंदर भविष्यातील आव्हानांच्या सामान्यासाठी सज्ज राहू या, सुरक्षा आपल्या हाती आहे, असे मौलिक मार्गदर्शन उद्योजक, आरआयएचे अध्यक्ष पी.पी. बारदेशकर यांनी उपस्थित कंपन्यांचे अधिकारी, कामगारांना केले.

रोहा इंडस्ट्रीयल असोसिएशन ॲम्युच्युअल ॲड रिस्पॉन्स ग्रुप, डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीयल सेफ्टी ॲन्ड हेल्थ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा झाला. धाटाव येथील आरआयए सभागृहात सांगता समारोप झाला. त्यावेळी बारदेशकर बोलत होते.

यावेळी प्रथमच पथनाट्य व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. आरआयए सेफ्टी अवॉर्ड स्पर्धा घेण्यात आली. बक्षीस वितरण व मार्गदर्शन कार्यक्रमाला आरआयएचे अध्यक्ष बारदेशकर, दयानंद नांदगावकर, एफडीसीचे साईड हेड नाथासाहेब कोळेकर, एक्सेल इंडस्ट्रीजचे हेड नीरजकुमार मिश्रा, अनेक प्रयोगचे प्रसाद देशमुख, रोहा डायकेमचे मुरगन, मार्गचे चीफ सुदाम करपे, एलपीचे राजेश खांडेकर, माजी चीफ कॉर्डिनेटर प्रकाश शेटे, मार्गचे प्रतिनिधी राजेश हजारे, अरुण माने, वैभव नाईक, डॉ. शैलेश नकाते, पत्रकार राजेंद्र जाधव, राजीव पडवळ, भाऊसाहेब माने आदी उपस्थित होते.

एफडीसीचे साईड हेड कोळेकर यांनी राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाची विस्तृतपणे मांडणी केली. पत्रकार राजेंद्र जाधव यांनी कंपनी, कामगार सुरक्षाबाबत मार्गदर्शन केले. संचालक दयानंद नांदगावकर यांनी सुरक्षेवर सादर केलेली कविता, सुदर्शन युनिट २ यांनी महिला सुरक्षा, रोहा डायकेमच्या कामगारांनी सादर केलेले गायन पथनाट्य कौतुकाची थाप मिळवून गेले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रणजीत गायकवाड, राजेश खांडेकर यांनी केले, तर सेनेस्को कंपनीचे हेड राजेश हजारे यांनी आभार व्यक्त केले.

# अंजुमन महाविद्यालयात अंतिम वर्ष पदवीच्या विद्यार्थ्यांना रोजगार व शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन

**मुरुड : प्रतिनिधी**




अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड–जंजिरा येथे अंतिम वर्ष पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी रोजगार व शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी आदेश डफळ उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वप्रथम स्वतःची आवड व क्षमता ओळखून करिअर निवडण्याचे महत्त्व पटवून दिले. पुढे त्यांनी एमसीए, एमबीए, संशोधन, अध्यापन, क्रीडा क्षेत्र तसेच एमपीएससी, यूपीएससी, बँकिंग परीक्षा आदी विविध क्षेत्रांतील संधींबाबत माहिती दिली तसेच उद्योजकतेस चालना देणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रभावीपणे मांडली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत विविध प्रश्न विचारले, ज्यांना आदेश डफळ यांनी समाधानकारक उत्तरे दिली. शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल करिअर व यशस्वी भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या मार्गदर्शन शिबिरामुळे विद्यार्थ्यांना करिअर नियोजन व शासकीय योजनांची उपयुक्त माहिती देण्यात आली असून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी योग्य दिशा मिळण्यास उपयुक्त ठरेल असा विश्वास प्राचार्य डॉ. साजिद शेख व आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इन्क्युबेशन समिती प्रमुख प्रा. जावेद खान तसेच आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग प्रमुख प्रा. रहीम बगवान यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी हुमेरा घारे हिने केले.

# वित्तीय साक्षरता अभियानात उल्लेखनीय कामगिरीबद्दल सुप्रिया पाशिलकर यांचा सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या वित्तीय साक्षरता अभियानात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सुप्रिया संजय पाशिलकर यांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया (रायगड विभाग) आणि क्रिसील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यात वित्तीय साक्षरता अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रोहा, सुधागड आणि महाड या तालुक्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली आहे.

सुप्रिया पाशिलकर या कोकण विभागातील एएम म्हणून कार्यरत असून त्या एकूण नऊ जिल्ह्यांमध्ये वित्तीय साक्षरतेचे कार्य पुढे नेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यातील टीमने गावोगावी जाऊन शेवटच्या घटकापर्यंत हे अभियान पोहोचविण्याचे काम यशस्वीरीत्या केले आहे. या कामगिरीची दखल घेत १७ मार्च रोजी अलिबाग येथे झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी किशन जावळे, आरबीआय मुंबईचे एलडीओ विशाल गोंडके, बँक ऑफ इंडिया रायगड विभाग प्रमुख दीपन्विता साहनी, रायगडचे एलडीएम विजयकुमार कुलकर्णी तसेच 'नाबार्ड'चे प्रदीप आपसुंडे यांच्या हस्ते पाशिलकर यांचा गौरव करण्यात आला तसेच तालुकानिहाय उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समन्वयक संजीवनी जयेश माने (रोहा), हेमलता समीर धुमाळ (महाड) आणि सोनाली निलेश पाटील (सुधागड) यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. याशिवाय, आर्थिक समावेशन आणि सामाजिक सुरक्षा बळकट करण्यासाठी गावपातळीवर प्रभावी काम करणाऱ्या रोहा तालुक्यातील खांबरे, पेण तालुक्यातील वाशी आणि महाड तालुक्यातील मोहोत या ग्रामपंचायतींचा सन्मान करण्यात आला. या यशस्वी उपक्रमाबद्दल रायगड जिल्हा टीमचे सर्व स्तरांतून विशेष कौतुक होत आहे.

# मुरुड तालुक्यात विकासकामे करणार –विघ्नेश माळी

**मुरुड : प्रतिनिधी**



सध्या अर्थ संकल्पीय अधिवेशन सुरू असून प्रत्येक आमदारांच्या मतदारसंघात विकासकामे करण्यासाठी राज्य शासनाकडून २५ कोटी रुपये देण्यात आले आहेत. मुरुड तालुक्याने दोन जिल्हा परिषद सदस्य व तीन पंचायत समिती सदस्य निवडून देऊन पंचायत समितीवरसुद्धा शिवसेनेचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या जनतेचे आमच्यावर ऋण असून आमदार महेंद्र दळवी हे खूप खुश असून येथील जनतेच्या समस्या नष्ट करण्यासाठी, जटिल प्रश्न सोडवण्यासाठी सर्वात प्रथम प्राधान्य देणार आहेत, असे शिवसेनेचे नेते व नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी यांनी सांगितले.

मुरुड शहरातील भंडारी बोर्डिंग येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी माळी बोलत होते. आमदार दळवी हे प्राप्त २५ कोटी रुपयांचा निधी मुरुड तालुक्यात खर्च करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, तालुका बांधकाम विभाग अध्यक्ष दिनेश मिणमीने, तालुका संघटक यशवंत पाटील, युवा नेते दीपेश वरणकार, सरपंच शरद खेडेकर, ध्रुव लोदी, चिंता लोदी आदी सोबत उपस्थित होते.

यावेळी विघ्नेश माळी यांनी सांगितले की, सध्या मुरुड साळाव रस्त्याचे काँक्रीटीकरण एमएमआरडीएच्या माध्यमातून सुरू आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून सर्व विकासकामे सुरू असून ती लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत. प्राप्त २५ कोटी रुपयांपैकी राजपुरी–खोकरी रस्ता खचला आहे तिथे संरक्षक भिंत बांधून रस्ता नव्याने तयार करण्यासाठी पाच कोटी ५० लाख रुपये खर्चाची तरतूद केली आहे. मुरुड शहरालगत असणारा एकदरा पूल हा १९६५ साली बांधण्यात आला होता. हा पूल कमकुवत झाल्याने त्या पुलाच्या पुनर्बांधणीसाठी १० कोटी रुपये खर्च करणार आहोत. मुरुड– शिघ्रे रस्ता हा खड्डेमय झाला असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तीन कोटी, मुरुड शहरातील परेश हॉटेल ते आगरदांडा हा रस्ता रुंदीकरणासह नव्याने बांधण्यात येणार आहे, त्यासाठी सहा कोटी ५० लाख रुपये खर्च केला जाणार आहे.

अलिबाग मुरुड रोहा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्र दळवी यांनी मुरुड तालुक्याला प्रथम प्राधान्य दिल्याबद्दल समस्त जनतेच्या वतीने त्यांचे आभार माळी यांनी मानले. यावेळी आगामी काळात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आरोग्य व शिक्षण विभागासाठी मोठा निधी प्राप्त करून विकास करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मुरुड तालुक्यातील चिचघर, विहूर व उसडी ही धरणे जिल्हा परिषद यांच्या मालकीची असून यामधील गाळ काढण्यासाठी व निधी प्राप्त व्हावा यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे ते म्हणाले.

# नववर्ष शोभायात्रा



































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com